
दैनिक

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

जनप्रभात

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे



✻ (आष्टी) वर्धा ✻ रविवार, ८ फेब्रुवारी २०२६ ✻ वर्ष ४ थे ✻ अंक ९३ ✻ पृष्ठ ६ ✻ मूल्य ५.०० RNI NO : MAHAR/2022/82242

खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत धान खरेदी योजना प्रभावीपणे राबविण्यास राज्य शासन कटिबद्ध – अग्रिम निधी वितरित

मुंबई, दि ७ : राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाला किमान आधारभूत किंमत (MSP) मिळावी व बाजारभावातील चढ-उतारापासून संरक्षण मिळावे, यासाठी खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत धान खरेदी योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या धान्याचा मोबदला वेळेत अदा करता यावा, यासाठी राज्य शासनामार्फत संबंधित खरेदी संस्थांना अग्रिम निधी वितरित करण्यात आला असल्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने कळविले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महासंघ तसेच जिल्हास्तरीय सहकारी संस्था यांच्या माध्यमातून जिल्हानिहाय अधिकृत खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली असून, निर्धारित गुणवत्ता निकषांनुसार भात, मका व ज्वारी खरेदी केली जात आहे. शेतकऱ्यांची नोंदणी, धान्याची गुणवत्ता तपासणी, अधिकृत वजन आणि हमीभावानुसार थेट बँक खात्यात देयक जमा करण्याची पारदर्शक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. खरेदी प्रक्रिया सुरळीत व गतिमान राहावी तसेच शेतकऱ्यांना देयके वेळेत मिळावीत, यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मार्फत भात खरेदीसाठी रु. १९४.७९ कोटी, मका खरेदीसाठी रु. १४.२४ कोटी व ज्वारी खरेदीसाठी रु. २.८३ कोटी अग्रिम निधी वितरित केला आहे. तर महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महासंघ मार्फत भात खरेदीसाठी रु. १२९.४५ कोटी, मका खरेदीसाठी रु. ४.६० कोटी आणि ज्वारी खरेदीसाठी रु. १६.३६ लाख इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.



सदर निधीमुळे खरेदी केंद्रांवरील साठवणूक, वाहतूक, मनुष्यबळ व देयक वितरण व्यवस्था अधिक सक्षम होणार असून, विशेषतः आदिवासी व दुर्गम भागातील शेतकऱ्यांना हमीभावाचा लाभ वेळेत मिळण्यास मदत होणार आहे. राज्य शासन शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असून, खरीप हंगाम २०२५-२६ मधील धान खरेदी पारदर्शक, कार्यक्षम व नियोजित कालावधीत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. नोंदणीकृत शेतकऱ्यांनी अधिकृत खरेदी केंद्रांवर आपला कृषी माल देऊन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

महाशिवरात्रीसाठी भीमाशंकर मंदिर बंद राहणार

भव्य सभामंडप उभारणीचे काम व परिसर विकास कामे वेगात सुरू; भाविकांनी प्रशासनास सहकार्य करण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांचे आवाहन

पुणे, दि. 7 : सन 2027 मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रयागराज येथे आयोजित महाकुंभ 2025 मधील अनुभवाच्या आधारे नाशिक कुंभमेळा कालावधीत नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या लाखो भाविकांपैकी मोठ्या संख्येने भाविक श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भेट देण्याची शक्यता आहे. साधारणत: दररोज सुमारे एक लाख भाविक येथे येण्याची शक्यता लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी श्री क्षेत्र भिमाशंकर विकास आराखडा (कुंभमेळा 2027 –गर्दी व्यवस्थापन व इतर सोयी सुविधा) या विशेष विकास आराखड्यास मंजुरी दिलेली आहे. या विकास आराखड्याअंतर्गत भाविकांसाठी सुरक्षित, सुयोग्य व सुसज्ज सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने विविध पायाभूत कामे हाती घेण्यात आलेली असून त्यामध्ये नवीन भव्य सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था, पायरी मार्ग तसेच गर्दी व्यवस्थापनासाठी आवश्यक सुविधा विकसित करण्याची कामे सध्या प्रगतिपथावर असून कुंभमेळ्यापूर्वी सर्व आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

कुंभमेळ्याच्या वेळेस श्री क्षेत्र भिमाशंकर येथे होणाऱ्या गर्दीचे प्रमाण लक्षात घेता जूना सभामंडपाचे क्षेत्र कमी पडणार असल्यामुळे नवीन भव्य सभामंडपाचे काम हाती घेण्यात आलेले असून त्याबरोबरच पायरी मार्गाचे काम देखील सुरू करण्यात आलेले आहे. मुख्य सभामंडप पूर्णत: उतरविण्यात आल्यामुळे नवीन सभामंडप तयार करताना श्री भिमाशंकर येथे रोज होणारी गर्दी लक्षात घेता मंदीर दर्शनासाठी बंद केल्याशिवाय सदरील काम करणे शक्य होणार नव्हते. तसेच सदर कामांच्या अंमलबजावणीदरम्यान बांधकाम साहित्य, मोठ्या आकाराचे दगड व अन्य यंत्रसामग्री मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर ठेवण्यात आलेली आहे. कामांचे स्वरूप, परिसरातील भौगोलिक परिस्थिती व भाविकांच्या मोठ्या संख्येचा विचार करता, बांधकाम सुरू असताना मंदिर दर्शनासाठी खुले ठेवणे हे सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक ठरू शकते. त्यामुळे भाविकांची सुरक्षितता अबाधित राखणे तसेच विकास आराखड्यातील कामे नियोजित कालमर्यादेत पूर्ण करणे या उद्देशाने यापूर्वी मंदिर तीन महिन्यांसाठी (महाशिवरात्रीचा कालावधी वगळून) तात्पुरते बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता.

पूर्वी भाविकांच्या सोयीचा विचार करून महाशिवरात्री कालावधी (दि. 12 फेब्रुवारी ते दि. 18 फेब्रुवारी 2026) वगळण्यात आला होता. तथापि, सध्या सुरू असलेल्या बांधकामाच्या कामाचा वेग, व्याप्ती व सुरक्षेच्या बाबींचा सखोल आढावा घेतल्यानंतर, मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात दगडी बांधकाम सुरू असल्याने तसेच दगड व बांधकाम साहित्य हलविणे शक्य नसल्यामुळे, महाशिवरात्री कालावधीत मंदिर दर्शनासाठी खुले ठेवणे सुरक्षिततेच्या दृष्टीने शक्य नसल्याचे निदर्शनास आले आहे. श्री क्षेत्र भीमाशंकर हा अतिवृष्टीचा प्रदेश असून जून ते सप्टेंबर या कालावधीत येथे अत्यंत जास्त पावसाचे प्रमाण असते. या कालावधीत बांधकाम कामे करणे शक्य नसल्याने उपलब्ध कालावधीतच कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. यामुळे विकास कामांना गती देणे अत्यंत गरजेचे आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करून पूर्वी महाशिवरात्री कालावधीत मंदिर खुले ठेवण्याच्या निर्णयामध्ये बदल करण्यात आलेला असून, दि. 12 फेब्रुवारी ते दि. 18 फेब्रुवारी 2026 या महाशिवरात्री कालावधीतही श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर भाविकांच्या नित्यदर्शनासाठी बंद राहणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पुणे जितेंद्र डूडी यांनी स्पष्ट केले आहे. भाविकांनी तसेच स्थानिक नागरिकांनी सदर निर्णयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासन यांना सहकार्य करावे असे आवाहन पुणे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे.

नदी पुनरुज्जीवन आणि प्लास्टिकमुक्त जलस्रोत हा राज्याचा प्राधान्यक्रम; जपानचे सहकार्य यासाठी मोलाचे – मंत्री पंकजा मुंडे

जपानच्या सागा प्रांताच्या गव्हर्नरच्या शिष्टमंडळाने घेतली पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची भेट

मुंबई, दि. ७ : पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची आज जपानमधील सागा प्रांताचे गव्हर्नर व उच्चस्तरीय शिष्टमंडळाने भेट घेऊन पर्यावरण, प्लास्टिक मुक्ती, शिक्षण आदी विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली. नदी पुनरुज्जीवन आणि प्लास्टिकमुक्त जलस्रोत हा राज्याचा प्राधान्यक्रम असून यासाठी जपानचे सहकार्य मोलाचे ठरेल, असा विश्वास पर्यावरण व दुग्धविकास मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला. समुद्रातील व नदीतील प्रदूषण रोखणे, प्लास्टिक कचऱ्याविरुद्ध संयुक्त प्रयत्न करणे तसेच शिक्षण, पशुसंवर्धन आणि सौंदर्यप्रसाधन उद्योग क्षेत्रात सहकार्य वाढविण्याबाबतही यावेळी महाराष्ट्र आणि जपानच्या शिष्टमंडळात सकारात्मक चर्चा झाली.

पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन

मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या 'रामटेक' या शासकीय निवास्थानी झालेल्या या बैठकीला जपानच्या सागा प्रांताच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व सागा प्रांताचे गव्हर्नर योशिनोरी यामागुची यांनी केले. त्यांच्यासमवेत प्रादेशिक देवाणघेवाण विभागाचे उपमहासंचालक मसाहिरो ओनो, आंतरराष्ट्रीय धोरण गटाचे उपसंचालक कोजी योशिताके, प्रकल्प प्रमुख कोकी कनामारू आणि जेट्रो सागाचे मुख्य संचालक हिरोशी योनेयामा तर, राज्याचे पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव देवेंद्र सिंह आदी उपस्थित होते. महाराष्ट्राला विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे.



मात्र, समुद्रातून वाहून येणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याचा प्रश्न गंभीर आहे. त्याचबरोबर नद्यांमधील प्रदूषण हीदेखील चिंतेची बाब असून, भारतीय संस्कृतीत नद्यांचे पवित्र स्थान लक्षात घेता त्यांच्या स्वच्छतेसाठी राज्य शासन विशेष कार्यक्रम हाती घेणार आहे, असे मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी राज्यपाल यामागुची यांनी जपानकडील तांत्रिक ज्ञान, व्यवस्थापन अनुभव आणि संशोधन क्षमता महाराष्ट्रासोबत सामायिक करण्याची तयारी दर्शवली. आशियाई समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी "ज्ञान भागीदारी"च्या माध्यमातून संयुक्त उपक्रम राबविण्याबाबत दोन्ही बाजूंनी सकारात्मक भूमिकेवर यावेळी चर्चा झाली.

दुग्ध व्यवसायावरही बैठकीत चर्चा

बैठकीत शिक्षण क्षेत्रातील सहकार्यालाही विशेष महत्त्व देण्यात आले. पर्यावरणीय शाश्वतता, पशुविज्ञान आणि वैज्ञानिक संशोधनासाठी परदेशी विद्यापीठांना राज्यात संधी उपलब्ध करून देण्याची तयारी पर्यावरण मंत्री श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केली. सागा प्रांतामधील संस्थांबरोबर संयुक्त संशोधन, विद्यार्थी देवाणघेवाण आणि तांत्रिक सहकार्याच्या शक्यता यावरही यावेळी चर्चा झाली. दुग्धव्यवसाय आणि पशुसंवर्धन क्षेत्रातील नवकल्पना तसेच सौंदर्यप्रसाधन उद्योगातील जपानचे प्रगत तंत्रज्ञान महाराष्ट्रासाठी उपयुक्त ठरू शकते, असे शिष्टमंडळाने नमूद केले. या क्षेत्रांत औद्योगिक व शैक्षणिक सहकार्य वाढविण्याची परस्पर तयारीही व्यक्त करण्यात आली.

पर्यावरण मंत्री यांना जपानचे निमंत्रण

प्लास्टिक व्यवस्थापनासाठी उभारण्यात येणाऱ्या वर्ल्ड ओशन प्लास्टिक प्लॅनिंग सेंटर या केंद्राला भेट देण्याचे निमंत्रण राज्यपाल यामागुची यांनी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना दिले.

भविष्यात परस्पर दौरे, तांत्रिक कार्यशाळा आणि दीर्घकालीन सहकार्य आराखडा तयार करण्याबाबत यावेळी चर्चा झाली.

पर्यावरण संरक्षण, शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील भारत-जपान सहकार्याला ही बैठक नवे परिमाण देणारी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

भारत आणि सेशेल्सचे संबंध मैत्रीपूर्ण आणि धोरणात्मक – सेशेल्स प्रजासत्ताकचे राष्ट्रपती डॉ.पॅट्रिक हर्मिनी

मुंबई,दि.७:

भारत आणि सेशेल्सचे संबंध हे मैत्रीपूर्ण, धोरणात्मक आहेत. दोन्ही देश हे हिंद महासागरातील महत्त्वाचे सागरी देश असून दोन्ही देशातील व्यावसायिक संबध अधिक बळकट करण्यावर आम्ही भर देत आहोत. व्यावसायिक परिषदेच्या माध्यमातून विकासाच्या संधी अधिक वाढतील ज्या दोन्ही राष्ट्रांसाठी महत्वपूर्ण ठरतील, अशी आशा सेशेल्स प्रजासत्ताकचे राष्ट्रपती डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांनी व्यक्त केली. सेशेल्स प्रजासत्ताकचे राष्ट्रपती डॉ. पॅट्रिक हर्मिनी व सेशेल्स प्रजासत्ताकच्या प्रथम महिला श्रीमती व्हेरॉनिक हर्मिनी यांचे शिष्टमंडळ भारत भेटीवर आहेत. या भेटीदरम्यान भारतीय उद्योग महासंघ आणि परराष्ट्र मंत्रालय यांच्यावतीने हॉटेल ताज येथे भारत आणि सेशेल्स व्यावसायिक परिषद बैठक आयोजित केली होती. यावेळी सेशेल्स या देशाचे अर्थमंत्री (आर्थिक नियोजन, व्यापार व गुंतवणूक) पिअर लापोर्ते, परराष्ट्र व्यवहार मंत्री बॅरी फॉली, भारत सरकारचे केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी व जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल, बंदरे, जहाजबांधणी व जलमार्ग मंत्रालयाचे सचिव विजय कुमार, मुंबई बंदर प्राधिकरणचे अध्यक्ष एम.अंगामुथू आणि आणि जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणचे अध्यक्ष गौरव दयाल, भारतीय उद्योग महासंघाचे (CII) प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. राष्ट्रपती डॉ. पॅट्रिक हर्मिनी म्हणाले की,दोन्ही देश सागरी क्षेत्र,आरोग्य व शिक्षण,ऊर्जा या क्षेत्रात व्यावसायिक दृष्ट्या नाविन्यपूर्ण संकल्पना विकसीत करत आहेत.आज सेशेल्समध्ये हजारो भारतीय वंशाचे नागरिक वास्तव्यास असून, त्यांनी सेशेल्सच्या सामाजिक व आर्थिक जडणघडणीत मोलाचे योगदान दिले आहे. पन्नास वर्षांहून अधिक काळापासून विविध क्षेत्रांमध्ये भारत व सेशेल्स संयुक्तरित्या काम करत आहेत.एक लहान बेटराष्ट्र म्हणून, जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेल्या भारताने केलेल्या उल्लेखनीय प्रगतीकडे सेशेल्स अत्यंत आदराने पाहतो.शाश्वत विकास आणि समृद्धीकडे वाटचाल करत असताना भारताच्या अनुभवातून आम्हाला खूप काही शिकण्यास मिळत आहे असेही ते म्हणाले. केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल म्हणाले की, भारत आणि सेशेल्स मध्ये हिंद महासागर ओलांडून व्यापार व संस्कृतींची देवाणघेवाण होत आहे. शिक्षण, आरोग्यसेवा, सागरी सुरक्षा तसेच आपत्ती प्रतिसाद या क्षेत्रांमध्ये स्थानिक गरजा आणि दीर्घकालीन शाश्वततेला केंद्रस्थानी ठेवून दोन्ही देशांमधील सहकार्य वृध्दींगत केले जात आहे.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली या भागीदारीला नव्याने गती मिळाली आहे असेही ते म्हणाले. सेशेल्स या देशाचे अर्थमंत्री (आर्थिक नियोजन, व्यापार व गुंतवणूक) पिअर लापोर्ते म्हणाले की,डिजिटल -सार्वजनिक पायाभूत सुविधांमध्ये भारताच्या नेतृत्वाचे आम्ही स्वागत करतो.नवीकरणीय ऊर्जा, विशेषतः सौरऊर्जा,सेवा क्षेत्र, गृहनिर्माण, पायाभूत सुविधा, दूरसंचार आणि रिअल इस्टेट विकास इत्यादी क्षेत्रांमध्ये भागीदारी केली तर सर्व समावेशक विकास आणि आधुनिक शहरी उभारणीस हातभार लागू शकतो. पर्यटन व आदरातिथ्य, ब्लू इकॉनॉमी विशेषतः मत्स्यव्यवसाय, वित्तीय क्षेत्र व फिनटेक, शिक्षण, हरित ऊर्जा (जसे ई-बससाठी सौर तंत्रज्ञान), तसेच चित्रपट उद्योग या क्षेत्रांमध्येही मोठी क्षमता आम्हाला दिसते.सेशेल्स हे व्यवसायासाठी खुले आहे. एक स्थिर, जागतिक स्तरावर जोडलेले आणि गुंतवणूक-अनुकूल वातावरण आमच्या देशात आहे असे ते म्हणाले.



संपादकीय...

सोशल मीडिया मराठी निबंध

आजच्या युगात सोशल मीडिया जगातील सर्वात जलद संप्रेषणाचे साधन बनले आहे. सोशल मीडियाची लोकप्रियता लोकांमध्ये दिवसेंदिवस वाढत आहे आणि याचा उपयोग प्रत्येक वयातील लोक करीत आहेत. परंतु ज्या पद्धतीने नाण्याच्या दोन बाजू असतात त्याच पद्धतीने सोशल मीडियाचे एकीकडे सकारात्मक फायदे तर आहेत परंतु दुसरीकडे यांचे भयंकर दुष्परिणाम देखील होत आहेत.आज जगभरात सोशल मीडिया अनेक प्रकारच्या कार्यांसाठी वापरले जाते. सोशल मीडियाच्या मदतीने कोणतीही बातमी खूप कमी वेळात जगभरात पोहोचवली जाते. वाढत्या टेक्नॉलॉजीमुळे जगातील एका कोपऱ् यात बसलेला व्यक्ति दुसऱ्या कोपऱ्यातील आपले मित्र व नातेवाईक यांच्याशी संपर्क साधू शकतो व फक्त आवाज ऐकणे नव्हे तर त्यांच्याशी व्हिडिओ कॉल द्वारे समोरासमोर संपर्क प्रस्थापित करू शकतो.सोशल मीडिया चे अनेक प्लॅटफॉर्म आहेत. भारतासह जगभरात व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम, युट्यूब इत्यादी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म प्रसिद्ध आहेत. आजकाल युट्युब वर अनेक ज्ञानवर्धक व्हिडिओ बनवले जातात. यूट्यूब वर कोणीही व्यक्ती चॅनल बनवून लोकांसमोर आपले ज्ञान व आपली कला दाखवू शकतो. आजकाल भारतातील अनेक लोक यूट्यूब च्या मदतीने घरबसल्या पैसे कमावत आहेत.याशिवाय फेसबुक, व्हॉटसअप व इंस्टाग्राम सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर आपले अकाउंट बनवून नवीन मित्र बनवले जातात आणि जुन्या मित्रांच्या संपर्कात राहिले जाते. या प्लॅटफॉर्म वर आपले नवीन नवीन फोटो टाकण्याची तरुणांमध्ये वेड आहे. सोशल मीडिया मुळे अनेक लहान मोठे व्यवसायिक ऑनलाइन स्वीच झाले आहेत. ज्यामुळे त्यांची विक्री वाढली आहे. ऑनलाईन आलेले सर्व व्यवसाय वेगाने प्रगती करीत आहेत.सोशल मीडिया चे फायदे तर अनेक आहेत. परंतु दुसरीकडे यामुळे अनेक नुकसान ही होत आहेत. सोशल मीडियाचा अती वापर करणाऱ्या लोकांवर नकारात्मक प्रभाव पडत आहेत. जे विद्यार्थी सोशल मीडिया मध्ये जास्त आवड दाखवत आहेत त्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होत आहे.इंटरनेट वापरणारे विद्यार्थी आपला अधिकांश वेळ सोशल मीडियावर फोटो लाईक करणे, व्हिडिओ पाहणे अश्या गोष्टींमध्ये वाया घालवत आहे. ज्यामुळे अनेक जण मानसिक रोगी झाले आहेत. तासनतास एका जागी बसून सोशल मीडिया वापरल्याने एकाग्रता कमी होते. शारीरिक वजन वाढायला लागते. व्यायाम व खेलकूद न झाल्याने शरीराला अनेक रोग ग्रस्तात.या शिवाय सोशल क्रांती खूप महत्त्वाचा शोध आहे. परंतु आपण याचा योग्य वापर करायला हवा. कारण शेवटी कोणत्याही गोष्टीचे परिणाम हे त्याच्या वापरकर्त्यावर अवलंबून असतात.

जनगणना का व कशी केली जाते?

(9फेब्रुवारी : भारतीय जनगणना प्रारंभ दिवस विशेष)

लोकांची मोजणी करण्याची प्रथा शासनव्यवस्थेच्या स्थापने इतकीच जुनी आहे. ईजिप्शियन, ग्रीक, रोमन, हिब्रू, पर्शियन, या लोकांनी लोकसंख्येची मोजणी वेळोवेळी केल्याचे इतिहासात नमूद आहे. चीन-जपानमध्येही पुरातन काळापासून अशी मोजणी होत असे. साधारणतः अशी मोजणी सैन्यभरतीस योग्य वय असलेल्या नागरिकांची किंवा करपात्र लोकांची संख्या समजण्यासाठी जरूर तेव्हा होत असे. सबंध शहराची लोकसंख्या मोजण्यास यूरोपमध्ये पंधराव्या व सोळाव्या शतकांत सुरुवात झाली. मद्रास शहराची अशी लोकसंख्या मोजणी सन १६८७मध्ये झाल्याचे नमूद आहे. त्यानंतर राष्ट्रीय स्वरूपाची जनगणना सुरू झाली. सरकारला ओबीसी प्रवर्गातील लोकांची वेगळ्या रकान्यातून जनगणना करावीच लागेल. का व कशी? यावर जोर देणारा लेख श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी यांच्या रोखठोक शब्दांतून... संपादक. स्वीडनमधील पहिली जनगणना सन १७५०मध्ये झाली. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात १७९० पासून व ग्रेट ब्रिटनमध्ये १८०१ पासून दर दहा वर्षांनी जनगणना घेण्यात येतात. भारतात पहिली जनगणना दि.९ फेब्रुवारी १८७२ रोजी सुरू करून ती काही महिन्यांती पार पडली व त्यानंतर सन १८८१पासून दर दहा वर्षांनी जनगणना घेण्यात आल्या. काही राष्ट्रे जनगणना दर पाच वर्षांनी घेतात, तर काही त्यांना जरूर वाटेल तेव्हा जनगणना करतात. हे काम बरेच खर्चाचे असल्यामुळे बहुतेक राष्ट्रांत दर दहा वर्षांनी जनगणना करण्याची प्रथा आहे. सुरुवातीस जनगणनेच्या वेळी प्रत्येक कुटुंबाविषयीची माहिती गोळा करीत, परंतु नंतर प्रत्येक व्यक्तीबद्दल माहिती गोळा करण्यात येऊ लागली. पुढे पुढे गरीब, दुर्बल, मागास समाज घटकांची माहिती घेतली जाऊ लागली. आता इतर मागासवर्ग- ओबीसींची माहिती गोळा करणे क्रमप्राप्त व अत्यावश्यक नाही का? अशी व्यक्तिगत स्वरूपाची राष्ट्रीय जनगणना सर्व प्रथम बेल्जियममध्ये सन १८४६मध्ये व अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात सन १८५०मध्ये घेण्यात आली. हळूहळू सर्वच राष्ट्रांनी अशा प्रकारची जनगणना घेण्यास सुरुवात केली. सन १९६०च्या सुमारास सबंध जगात एकूण १८०हून अधिक जनगणना घेण्यात आल्या आहेत. त्यात लोककल्याणाच्या उदयोन्मुख समस्या व प्रश्नांना प्राधान्याने घेऊन त्यासाठी विकासात्मक धोरण अवलंबिले आहेत. हे काय खोटे आहे? स्वातंत्र्यपूर्व काळात आठ व स्वातंत्र्योत्तर काळात तीन वेळा जनगणना या भारतात झाल्या. वेळोवेळी जनगणना अधिनियम संमत करण्यात येऊन त्यांनुसार जनगणना घेतली जाते. त्यासाठी आयुक्त, संचालक, पर्यवेक्षक वगैरे अधिकारी नेमण्यात येतात. त्यांना इतर अधिकाऱ्यांची मदत होते. प्रत्यक्ष गणनेचे काम प्रगणकांकडे सोपविण्यात येते. शिक्षक, पोलीस, जिल्हा परिषदांचे व नगरपालिकांचे कर्मचारी या सर्वांची मदत गणनेसाठी घ्यावी लागते. त्यांची निवड झाल्यावर जनगणना कशी घ्यावी? निरनिराळ्या यादया व अनुसूच्या कशा वापराव्यात? प्रश्नांवलीतील प्रश्नांची उत्तरे कशी लिहून घ्यावीत? आदी बाबींचे त्यांना प्रशिक्षण दयावे लागते. त्यांच्याकडून नमुन्यादाखल काही माहितीही गोळा करून घ्यावी लागते. सन १९७१मध्ये झालेल्या जनगणनेच्या वेळी प्रगणकाला चार प्रकारच्या यादया तयार कराव्या लागल्या होत्या. आज इतर मागासवर्ग आपली जनसंख्या जाणून घेण्याच्या मनस्थितीत आहे, तेव्हा त्यांचीही माहिती वेगळ्या रकान्यातून करणे प्रशासनाला अत्यंत निकडीचे आहे, आढेवेढे घेऊन ते टाळणे महागात पडू शकते. कारण व्यक्तिगत पट्टीद्वारा गोळा केलेली सर्व माहिती गोपनीय मानली जाते. देशाच्या काही भागांत स्थानिक वा राजकीय अडचणींमुळे गणनेच्या कालखंडात आवश्यक ते फेरफार करावे लागतात. जनगणनेत गोळा झालेल्या माहितीचे जिल्हागणिक आणि राज्यागणिक संकलन करून तात्पुरत्या स्वरूपाचे आकडे जनगणनेचे काम संपल्यापासून पाच दिवसांच्या आतच मध्यवर्ती जनगणना कार्यालयाकडे उपलब्ध होऊ शकतात. यावरूनच या अवाढव्य प्रशासकीय प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या संघटनात्मक प्रयत्नांची व भारतीय जनतेने दिलेल्या उत्स्फूर्त सहकार्याची काहीशी कल्पना येऊ शकते. याकामी जनतेचे सहकार्य फार मोलाचे ठरते. आता जर का भारत सरकारने इतर मागास वर्ग- ओबीसी समाजघटकातील लोकांच्या इच्छेविरुद्ध जनगणना सुरू केली तर त्यांचे सहकार्य मिळणे शक्यच नाही. हा संपूर्ण घटक-समूह पुढील प्रत्येक जनगणनेवर बहिष्कार टाकण्याच्या पावित्र्यात खंबीर उभा ठाकला आहे. त्यामुळे देशाच्या विकास कार्यास खिळ बसणे साहजिकच आहे. जनगणना म्हणजे एखाद्या राष्ट्राच्या हद्दीत राहणाऱ्या लोकांची मोजणी होय. आधुनिक काळात प्रत्येक राष्ट्रातील शासनाचे हे एक अटळ कर्तव्य झाले आहे. राष्ट्राची लोकसंख्या किती? त्यातील लोकांची सामाजिक व आर्थिक वैशिष्ट्ये कोणती? त्यांचे राष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत वितरण कसे झाले आहे? सामाजिक व जीवशास्त्रीय फेरफारांचे त्यांच्यावर कसकसे परिणाम होतात? आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक किती? सामाजिक घटक कोणते? त्या त्या सामाजिक घटकांतील लोकसंख्या किती? आदी अनेक प्रश्न दैनंदिन प्रशासनासाठी महत्त्वाचे ठरतात. त्यांना यशस्वीरित्या हाताळण्यासाठी आवश्यक असलेली माहिती जनगणनेद्वारा उपलब्ध होते. शासनाला केवळ जनगणनाच नव्हे, तर प्रसंगोपात इतर अनेक प्रकारच्या गणना करण्याची आवश्यक भासत असते. उदा. कृषिगणना, पशुधनगणना, उत्पादनगणना, घरांची मोजणी, जनगणना इत्यादी. मग ओबीसी जनगणना का बरे होऊ नये? अशा सर्व गणनांतून उपलब्ध होणारी आकडेवारी राष्ट्रीय प्रगती दर्शविते व राष्ट्राच्या अनेक समस्यांचा उलगडा करण्यास उपयोगी पडते. विशेष करून जनगणनेद्वारे मिळणाऱ्या माहितीतून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप व राष्ट्राचे मानवी भांडवलरूपी सामर्थ्य यांवर यथोचित प्रकाश टाकला जाऊ शकतो. जनगणना म्हणजे विशिष्ट काळी एखाद्या राष्ट्रातील किंवा प्रदेशातील सर्व लोकांबद्दलची जनांकिकीय, आर्थिक व सामाजिक आकडेवारी गोळा करणे आणि तिचे योग्य संकलन करून तिला प्रसिद्धी देण्याची संपूर्ण प्रक्रिया होय. जनगणनेच्या सहा वैशिष्ट्यांवर संयुक्त राष्ट्रांनी भर दिला आहे- जनगणनेला राष्ट्राचा पुरस्कार पाहिजे, तिचे क्षेत्र व घटक निश्चित असले पाहिजे, त्या क्षेत्रातील सर्व व्यक्तींचा त्यात समावेश झाला पाहिजे, ती गोळा केलेली माहिती विशिष्ट कालक्षणाबद्दल असली पाहिजे, प्रत्येक व्यक्तीविषयी अलग-अलग माहिती नमूद केली पाहिजे, गोळा केलेली माहिती प्रसिद्ध झाली पाहिजे. जनगणना करताना संबंधित राष्ट्रे त्यांना त्या वेळी महत्त्वाच्या वाटणाऱ्या बाबींविषयी माहिती गोळा करतात. कालमान व परिस्थिती यानुसार निरनिराळ्या जनगणनांतील बाबी वेगवेगळ्या असू शकतात. जनगणनेत खालील बाबींचा समावेश हवा, असे संयुक्त राष्ट्रांनी सुचविले आहे- जनगणनेच्या वेळी व्यक्तीची स्थाननिश्चिती व नेहमीचे राहण्याचे ठिकाण, कुटुंबप्रमुखाशी नाते, लिंग, वय, वैवाहिक स्थिती, जन्मस्थळ, नागरिकत्व, आर्थिक व्यवसाय, उद्योग, हुद्दा, भाषा, वंशत्व व राष्ट्रीयत्व, साक्षरता, शैक्षणिक पातळी, शालेय हजेरी व प्रत्येक स्त्रीला किती अपत्ये झाली त्यांची संख्या नोंद करावी. ज्या राष्ट्रांना या सर्व बाबींचा जनगणनेत समावेश करता येणे शक्य नसेल, त्यांनी किमानपक्षी लिंग, वय, वैवाहिक स्थिती व आर्थिक व्यवसाय याबाबींची माहिती तरी गोळा केलीच पाहिजे. मागील सन २०११च्या शिरगणतीनंतर म्हणजेच दहा वर्षांनंतर सन २०२१मध्ये होणे क्रमप्राप्त असताना सरकारने जनगणना करण्याकडे जाणूनबुजूनच कानाडोळा केला. आज जनगणनेविना तब्बल ३ वर्षे उलटून गेली. ओबीसींच्या स्वतंत्र जनगणनेला सरकार टरकले की काय? एक न उलगडणारे कोडेच आहे तर.... जनगणना दोन प्रकारांनी करता येते. एकतर प्रत्येक कुटुंबप्रमुखाकडून छापील प्रश्नावली भरून घ्यावयाची किंवा गणना करणाऱ्यांनी कुटुंबप्रमुखांना समक्ष भेटून माहिती घ्यावयाची आहे. काही देशांत जनगणनेपूर्वी सर्व घरांची यादी व मोजणी करतात व तिच्या आधारे जनगणनेच्या वेळी कोणीही वगळले जाऊ नये, अशी काळजी घेतात. गोळा केलेल्या माहीतीचे त्वरित संकलन व सारणीकरण व्हावे, अशी व्यवस्था करावी लागते. त्यानंतरच सारणीरूपाने निरनिराळ्या बाबींविषयींची वर्गीकृत माहिती प्रसिद्ध करता येते. जनगणना अपूर्ण राहू नये, तिच्यात चुका होऊ नयेत यांसाठी प्रश्नावली तयार करण्यापासून ते थेट अखेरच्या आकडेवारीचे संकलन प्रसिद्ध करेपर्यंत प्रत्येक टप्प्याला शक्य तेवढी काळजी घ्यावी लागते. जनतेचे पुरेपूर सहकार्य आणि कार्यक्षम प्रशासन यंत्रणा यांशिवाय जनगणनेची कार्यक्षमता व गुणवत्ता पूर्णपणे समाधानकारक असूच शकत नाही. जनगणना अनेक कारणांसाठी घेतली जाते. सामाजिक व आर्थिक विकासाचे प्रयत्न करण्यासाठी ती आवश्यकच ठरते. आरोग्य, साक्षरता, शिक्षण, उत्पन्न, राहणीमान, अन्नपुरवठा, कृषिउत्पादन, औद्योगिक उत्पादन आदी क्षेत्रांत सुधारणा घडवून आणण्याच्या योजना आखण्यासाठी बऱ्यांच विविध माहितींची आवश्यकता असते. मतदान पद्धतीने लोकप्रतिनिधी निवडणे व कल्याणकारी राज्यातील सुविधांचे योग्य वाटप करणे, यांसाठीही जनगणेतील माहिती उपयोगी पडते. उद्योगपती व व्यापारी संख्या जनगणनेच्या आधारे आपापल्या व्यवसायांचे योग्य नियोजन करू शकतात. शिवाय आर्थिक, सामाजिक व जनांकिकीय प्रश्नांवर संशोधन करणाऱ्यांना जनगणनेमधून उपलब्ध होणारी माहिती अनेक दृष्टींनी उपयुक्त असते. म्हणूनच जनगणनेला संशोधनाचे आणि प्रशासनाचे एक बहुउद्देशीय साधन मानतात. सन १९६१पूर्वी जनगणनेसाठी लागणारी संघटना प्रत्यक्ष गणनावर्षापूर्वी एकदोन वर्षे अगोदरपासून अस्तित्वात येई व जनगणनेची कार्यवाही संपल्यानंतर दोनतीन वर्षांतच विलयास जाई. त्यामुळे जनगणनेच्या प्रश्नांकडे सातत्याने लक्ष पुरविणाऱ्या संघटनेचा भारतात अभाव होता. ही उणीव सन १९६१नंतर भरून काढण्यात आली. केंद्र, प्रत्येक राज्य व केंद्रशासित प्रदेश यांत आता जनगणना कार्यालये सातत्याने कार्यप्रवण असतात. त्यांना आगामी जनगणनेची पूर्वतयारी करण्यास पुरेसा अवधी मिळतो. जनगणनेच्या वेळी राज्यांसाठी नेमण्यात येणाऱ्या पर्यवेक्षकांना आता जनगणना संचालक म्हणतात. सन १९७१च्या जनगणनेसाठी जनगणना आयुक्त आणि महानिबंधक या अधिकाऱ्यांची नेमणूक सन १९६८मध्ये व बहुतेक राज्य संचालकांच्या नेमणुका सन १९६९मध्येच करण्यात आल्या होत्या. मग इतर मागासवर्ग- ओबीसींची स्वतंत्र रकान्यात नोंद करून घेण्यास अडचणी येतीलच कशा?!! **भारतीय जनगणना आरंभ दिनाच्या सप्ताहभर सर्व सूज्ञ भारतीय बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सअॅप-
९४२३७१४८८३.

श्री गजानन..

श्री गजानन विजय
मनोभावे गा वाचा
शब्द शब्द मधुकण
सुशुध्द होईलं वाचा

पाठीशी सदैव राही
महाराणाशेगावीचा
अमृत अनुभव देई
पुलकित करी ऋचा

सुप्रभाती सुचिर्भुत
मनंगणी फुले वेचा
विचार दुर्गंधी दुरावे
सडापारिजातकाचा

भक्ती अधिष्ठानावर
पुण्य संचय ते रचा
कळेलं सार सार्थ ते
करिता विद्वान चर्चा

गणगण गणात बोते
स्पर्श न होईल ग चा
निस्पृहकर्मयोग करे
तोचं गुरु भक्तसच्चा

गजानन नामस्मरण
विसरपडेलं विश्वाचा
जीव ब्रह्म एक आहे
विचार जाणा साचा

– हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996..

धर्मासन ..

सरस्वतीकार्तिकेय
मोर दोघांचे वाहन
व्याघ्र सिंहारुढदेवी
प्रिय तिले सिंहासन

शंकर बसे बैलावर
पवित्रतम ते गो धन
सुखकर्ता दुःखहर्ता
मूषकारुढ गजानन

गरूड पक्षा भ्रमण
श्रीविष्णू वैश्यंपायन
चार वेदांचा सन्मान
गुरुदत्त भोवतीश्वान

गोपाळ स्वता कृष्ण
गो रक्षक मधूसूधन
ब्रह्मदेवा आवडे हंस
तारिणीमाबदकासन

गजांतलक्ष्मी शोभते
हत्तीवरी शक्तीवान
सप्तअश्वाच्या रथात
भ्रमणे सूर्य भगवान

विविध देव देवतांना
प्राणी पक्षांचे आसन
नैसर्गिक प्रति पालन
निमीते करी संवर्धन

– हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996

'त्यागमूर्ती माता रमाईंचे आयुष्य म्हणजे धैर्याची आणि त्यागाची गाथा' – माजी राज्यमंत्री ॲड. सुलेखाताई कुंभारे

कामठी (दिलीप येवले): "माता रमाई या केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्नी नव्हत्या, तर त्या कोट्यवधी शोषितांच्या आधारस्तंभ होत्या. बाबासाहेबांनी जेव्हा सातासमुद्रापार जाऊन ज्ञानार्जन केले, तेव्हा घराची धुरा माता रमाईंनी अत्यंत संयमाने आणि त्यागाने सांभाळली. त्यांनी स्वतःची मुले गमावली, दुःख सोसले, पण बाबासाहेबांच्या ध्येयपूर्तीत कधीही अडथळा येऊ दिला नाही.आजच्या पिढीने, विशेषतः विद्यार्थिनींनी, माता रमाईंचा स्वाभिमान आणि सोशिकता आपल्या जीवनात अंगीकारली पाहिजे. हरदास शैक्षणिक संस्थेचा उद्देश केवळ शिक्षण देणे नसून, अशा महान विभूतींचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे हा असल्याचे प्रतिपादन संस्थेच्या अध्यक्ष व माजी राज्यमंत्री ॲड सुलेखाताई कुंभारे यांनी केले. त्या त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून, हरदास शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थेच्या वतीने संचलित हरदास विद्यालय आणि ड्रॅगन पॅलेस इंटरनॅशनल स्कूल येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होत्या. त्यांच्या हस्ते माता रमाईंच्या प्रतिमेला माल्यार्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी 'जय भीम', 'माता रमाईंचा विजय असो' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.शाळेच्या प्रांगणात शिक्षक आणि शेकडो विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध रीतीने उपस्थित राहून माता रमाईंना आदरांजली वाहिली. हरदास विद्यालय चे मुख्याध्यापक श्री. देवेंद्र जगताप, ड्रॅगन इंटरनॅशनल स्कूल च्या प्रिंसीपल अंबरीन फातीमा तसेच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.



जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) **RNI NO : MAHMAR/2022/82242**

अत्यंत धक्कादायक.... तब्बल ४ लाख गुरुजी नापास

बौध्दिक वैचारिकता खालावलेले असे गुरुजी विद्यार्थ्यांची शैक्षणिक कुशलता कशी उंचावणार ?....पालकांचा सवाल !

परभणी / दत्तात्रय कराळे

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या महा-टीईटी २०२५ परीक्षेत चक्क ३ लाख ९६ हजार उमेदवार नापास झाले असून केवळ ११ टक्के निकाल लागला आहे. त्यामुळे राज्यातील शिक्षक गुणवत्तेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. अत्यंत खेदाची बाब म्हणजे या परिक्षेत केवळ आणि केवळ ११ टक्केच परिक्षार्थी गुरुजी पात्र ठरले आहेत ! उद्याची पिढी घडवणारे 'गुरुजी'च जर परीक्षेत नापास झाले का असल्याने त्या शिक्षकांची ढासळलेली बौध्दिक शैक्षणिक पात्रता संशयास्पद वाटणे स्वाभाविक आहे. त्याशिवाय शासन, प्रशासन आणि शिक्षण मंडळाच्या भ्रष्ट कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले जाणे स्वाभाविक आहे. शिक्षक पण शिकविण्यास पात्र असावे म्हणून राज्य शासनाने शिक्षक पात्रता परीक्षा घेणे सूरू केले आहे. विद्यार्थ्यांना घडविणारे शिक्षक वृंद पण 'तावून सुलाखून' निघणार असतील तर उत्तम. हा त्यामागचा हेतू शासनाने ठेवला आहे. परंतु, बघतो तर काय, चक्क नापास झालेले शिक्षकच लाखोंच्या संख्येने निघाले, असा आश्चर्यकारक व कमालीचा असा धक्कादायक निकाल पुढे आला असल्याने याला जबाबदार सर्वांनाच चिंतन करण्याची खरी गरज असल्याचे दिसून येत आहे. शिक्षकांची पात्रता ठरविणाऱ्या महा-टीईटी २०२५ चा निकाल नुकताच जाहीर करण्यात हा निकाल शिक्षण क्षेत्रास मोठा धक्का देणारा ठरला असल्याच्या कडवट प्रतिक्रिया असंख्य चिकित्सक विशेषत: दस्तूरखुद्द शैक्षणिक वर्तुळातही व्यक्त केली जात आहे. राज्यात मोठ्या संख्येने शिक्षक पात्र होण्यास इच्छुक उमेदवारांनी ही परीक्षा दिली होती. त्यापैकी केवळ ११ टक्के उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. म्हणजेच ३ लाख ९६ हजार पेक्षा अधिक उमेदवार विद्यार्थी नापास झाल्याची धक्कादायक अशी ही आकडेवारी स्पष्टपणे दिसत आहे. आता हेच गुरुजी शासन आयोजित परिक्षेत आणि तेही एवढ्या मोठ्या प्रमाणात नापास होत असतील तर ते आपली गुणवत्ता कशी सिद्ध करु शकणार, असा चिंताजनक प्रश्न निश्चितच उपस्थित केला जाणे स्वाभाविक आहे. उद्याची पिढी घडविणाऱ्या शिक्षकांचीच पात्रता एवढ्या खालच्या व निष्क्रिय स्तराला गेली असेल तर शासन व प्रशासनातील अधिकाऱ्यांनी केवळ लक्ष्मी दर्शनाची अपेक्षा न करता फुकटचे वेतन गिळंकृत करु पहाणाऱ्या आणि विद्यार्थ्यांना वेठीस धरणाऱ्या अशा शिक्षकांवर कठोर कारवाईचा बडगा उचलणे आवश्यक ठरणार आहे. किंबहुना तसे ठरविणे भाग पडले जावे, हेच या महा-टीईटी परीक्षेतील निकालातून सिध्द झाल्याचे आता सिद्ध झाले आहे. परिणामी अशा गुरुजींच्या खऱ्या शाळा घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे. लाखोंच्या संख्येने गुरुजी जर नापास होत असतील, तर अशा निष्क्रिय शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मुलांचा तरी चांगला बौध्दिक विकास होऊ शकेल आणि ते घडणार तरी कसे ? असा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. राज्य परीक्षा परिषदेकडून जाहीर करण्यात आलेली माहिती धक्कादायक असून त्यात एकूण ४ लाख ७५ हजार ६६९ उमेदवारांनी या महा-टीईटी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यात ४ लाख ४६ हजार ७३० उमेदवार विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षा देण्यास उपस्थित झाले होते. तर, २८ हजार ९३८ विद्यार्थी परिक्षेलाच अनुपस्थित राहिले होते. शासनाकडून महिन्यांसाठी भरमसाठ असे वेतन मिळत असल्याने गलेलठ्ठ झालेले हेच शिक्षक तेवढ्यावर समाधान मानतील तर कसे ? चक्क शासनाच्या नियमांना ठेंगा दाखवत ते विशेषतः पती-पत्नी असले तरी खासगी शिकवणी घेत असतात. काही कथित हुशार शिक्षक नामांकित अशा कोचिंग क्लासेसमध्ये सुध्दा मोठे मानधन मिळवतात. तर निम्म्या पैकी अधिकतर शिक्षक-शिक्षिका स्वतःच्या घरी किंवा भाड्याने मोठमोठ्या जागा घेऊन खासगी शिकवण्या खुलेआम घेत असतात. वारेमाप मिळणारा अगणित असा हा पैसा कुठे साठवला जावा, यांची चिंता लागलेले यापैकी बरेच शिक्षक त्यातूनच मिळणाऱ्या लक्ष्मीदर्शनातून अव्वाच्या सव्वा किमतीत हिऱ्या मोत्यांचे, सोन्या-चांदीने भरमसाठ दागिने, एक दोन नव्हे तर पाच दहा महागडे फ्लॅट, बंगले विकत घेत असतात. तर, कोणी ५० ते लाख दीड लाख प्रती एकर भावाने मुबलक जमीन खरेदी करुन मालामाल झालेले आहेत. कांहीं मान्यवर शिक्षक स्थानिक शैक्षणिक संस्थेतील चालक, संचालक तथा व्यवस्थापनाला हाताशी धरुन नव्हे, आर्थिक साठ गाठ ठेवत मनाला वाटेल तेव्हा दांड्या मारत असतात. तर, काही जण शाळेला दांड्या मारुन चक्क आपल्या शेतीतही काम पार पाडत असतात. विविध मार्गांनी मिळणाऱ्या वारेमाप कमाईचे हेच करोडपती शिक्षक विद्यार्थ्यांची शैक्षणिक बुध्दीमत्ता वाढविण्यापेक्षा अधोगतीकडे नेत असतात. काळ्या कमाईने मालामाल झालेल्या या शिक्षकांना स्वतः अभ्यास करायला वेळ मिळत नसतो, तेथे विद्यार्थ्यांना काय डोंबलं शिकवणार हा खरा चिंतेचा विषय आहे. अनेकजण हीच काळी कमाई विविध उपक्रमांमध्ये गुंतवणूक करुन खरबोपती बनण्याचे स्वप्न बघत असतात. शासनाकडून अशा निष्क्रिय व नापास झालेल्या सर्व शिक्षकांची व त्यांच्या संपत्तीची कसून चौकशी करणे आवश्यक आहे. लाखो रुपये वेतन घेऊनही विद्यार्थ्यांकडे दूर्लक्ष करणे व त्यांच्या बौध्दिक आणि शैक्षणिक प्रगतीवर घाला घालणे यासारखे पाप केलेले असते. किंबहुना त्यासाठीच भ्रष्टाचार व विविध मार्गांनी मिळवलेल्या संपत्तीत आढळून येणारे जे जे दोषी दोषी निष्पन्न होतील, त्या सर्वांना निलंबित करत सर्वांकडून शासनाने दिलेले वेतन सक्तीने वसूल करणे गरजेचे आहे. तद्वतच ज्यांना नोकरीची खरी गरज आहे, अशां गरजूंची त्या ठिकाणी नियुक्ती केली गेल्यास त्यांच्यावर अवलंबून कुटुंबातील घटकांचे पोषण करु शकतील. विशेष म्हणजे जे शिक्षक म्हणून सेवेत आहेत, अशा कोणाही शिक्षकांना शाळेव्यतिरिक अन्यत्र कुठेही व कोणतीही खासगी शिकवणी घेता येणार नाही असा कठोर दंडक प्रतिबंध असावा. कायदा धाब्यावर बसवून शासन नियमांना ठेंगा दाखवत खासगी शिकवणी घेताना आढळून आल्यास जागेवर निलंबनाची कारवाई केली जावी.



प्रत्येक ग्रंथालयाच्या ग्रंथपालाने वाचक सल्लागार झाले पाहिजे - डॉ. राजेंद्र कुंभार

परभणी, अरविंद कांबळे

पूर्णा (जंक्शन) प्रतिनिधी – आजच्या परिस्थितीमध्ये प्रत्येक शाळा महाविद्यालयातल्या व सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथपालांनी वाचकांचे खऱ्या अर्थाने सल्लागार झाले तरच ग्रंथालय चळवळ विकसित होईल असे प्रतिपादन पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र कुंभार यांनी केले. ते येथील स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय पूर्णा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ग्रंथालयशास्त्र आणि गृहविज्ञान विषयाच्या एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आणि परभणी जिल्हा ग्रंथालय संघाच्या ४८ व्या जिल्हा अधिवेशनाच्या उदघाटन कार्यक्रमाच्या बीजभाषणात डॉ. राजेंद्र कुंभार बोलत होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे प्र - कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी केले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष माननीय गुलाबराव कदम हे होते.गृहविज्ञान विषयाच्या बीजभाषक विशाला पटनम, प्रा. डॉ. सुनिता काळे (पवार), डॉ. रमण्णा देशेट्टी, प्राचार्य डॉ. मनोहर नलावडे, प्राचार्य डॉ.एन.बी. दहिभाते, जीवन लोखंडे , सुनील हुस्से ,उत्तमराव कदम, डॉ. सुभाष चव्हाण, अनिल बाविस्कर, खंडेराव सरनाईक, डॉ. धर्मराज वीर,व. गं. सूर्यवंशी, मधुकर गरड, सुनील वायाळ, राजेंद्र हंबीरे आदी मान्यवर या सत्रासाठी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. कुंभार म्हणाले की, आजच्या समाज जीवनात प्रत्येक माणसांचा स्क्रीन टाईम वाढल्यामुळे वाचन संस्कृती लयास जात आहे. त्यामुळे माणसांची स्मरणशक्ती कमी होत असून ती मारली जाण्याची भीती निर्माण झाली आहे. वर्तमान समाजापुढील ही एक मोठी सामाजिक समस्या निर्माण झाली असून हे समाजापुढचे मोठे आव्हान आहे. याला सामोरे जायचे असेल तर वाचन संस्कृती व ग्रंथालय चळवळ मोठी झाली पाहिजे. वाचनामुळे शब्दांचे सामर्थ्य वाढते ,विवेक विकसित होतो. प्रतिभा वाढते. वाचनामुळे मानवी जीवनाचा विकास होतो. म्हणून वाचन संस्कृती वाढविण्यासाठी ग्रंथपाल यांनी जाणीवपूर्वक वाचक वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असेही त्यांनी यावेळी आपल्या मार्गदर्शनात सांगितले. गृहविज्ञान विषयाच्या बीजभाषक प्रा. विशाला पटनम यांनी मानवी जीवनाच्या विकासासाठी सुशिक्षित असलेल्या प्रत्येकांनी सकारात्मक कार्य केले पाहिजे. शिक्षक व विद्यार्थी यांनी वाचन संस्कृती जोपासत समाजात बंधुभाव निर्माण करून विज्ञाननिष्ठा बाळगली पाहिजे. त्यामुळे समाजात सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण होऊन समाज सुखकर होऊ शकतो. यासाठी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे सातत्यपूर्ण कार्य हेच समाजाला प्रेरणादायी असते असेही त्यांनी यावेळी आपल्या मार्गदर्शनात सांगितले. याप्रसंगी स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार अण्णा यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांना स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार जीवन गौरव पुरस्कार व ग्रंथालय चळवळीतील समर्पित कार्यकर्त्यांना स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार ग्रंथमित्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी ग्रंथालयाच्या विविध समितीवर निवड झालेल्या मान्यवरांचाही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पुरस्कारांची भूमिका महाविद्यालयाचे प्राचार्य तथा संस्थापक सचिव डॉ. रामेश्वर पवार यांनी केले यांनी मांडली.राष्ट्रीय चर्चासत्राच्या उदघाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. संजय कसाब यांनी केले तर आभार सहसंयोजक प्रा.डॉ.अशोक कोलंबीकर यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजक डॉ. सुरेखा भोसले, डॉ. अशोक कोलंबीकर,प्रा. डॉ. संजय कसाब, प्रा. डॉ. भारत चापके, डॉ. विलास काळे, प्रा.नंदा चारलवाड, प्रा. अनिता भोळे, प्रा. विठ्ठल डाके प्रा. रुपेश लोखंडे प्रा. सुरेश वावळे, प्रा.रत्नदीप गायकवाड, प्रा. सुरेश पवार ,वरिष्ठ लिपिक सूर्यकांत भोसले, गिरधारी कदम, माधव कल्हाळीकर महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व ग्रंथालय संघाचे कार्यकर्ते यांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले.या राष्ट्रीय चर्चासत्रासाठी ग्रंथालय शास्त्र आणि गृहविज्ञान विषयाचे संशोधक, विद्यार्थी व अभ्यासक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.





निर्मलाबाई कांबळे माता रमाई गणगोत पुरस्काराने सन्मानित

कंधार (संतोष कांबळे)

येथील सामाजिक कार्यकर्त्या निर्मलाबाई कांबळे यांना माता रमाई गणगोत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नांदेड आकाशवाणीचे कार्यक्रमाधिकारी राहुल आत्राम यांच्या हस्ते निर्मलाबाई कांबळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त माता रमाई विचारमंच आणि माता रमाई जयंती मंडळ, जवळा दे ता.लोहा जि.नांदेड यांच्या वतीने शनिवारी, दि.७ फेब्रुवारी रोजी माता रमाई गणगोत पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड आकाशवाणीचे कार्यक्रमाधिकारी राहुल आत्राम, तर प्रमुख पाहुणे म्हणून सोनखेड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक सुभाष खाडे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संरक्षण सचिव आनंद गोडबोले, प्रसिद्ध स्तंभलेख भैय्यासाहेब गोडबोले, प्रसिद्ध साहित्यिका रुपाली वागरे, ख्यातनाम पत्रकार राजेश्वर कांबळे, माजी सरपंच साहेब शिखरे, जवळा दे चे पोलीस पाटील नितीन गवळी, माजी ग्रामपंचायत सदस्य प्रल्हाद मोरे, सामाजिक कार्यकर्ते अंकुश शिखरे, माता रमाई जयती मंडळाच्या अध्यक्षा भारतबाई निखाते, उपाध्यक्षा करुणाबाई गच्चे, भीमजयंती मंडळाचे अध्यक्ष भीमराव गोडबोले, सचिव मायाबाई गोडबोले, समता सैनिक दलाच्या केंद्रीय सहाय्यक शिक्षिका तेजस्विनी मस्के, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश गोडबोले आदी मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यात सामाजिक कार्यकर्त्या निर्मलाबाई कांबळे यांना माता रमाई गणगोत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नांदेड आकाशवाणीचे कार्यक्रमाधिकारी राहुल आत्राम यांच्या हस्ते निर्मलाबाई कांबळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, भारताचे संविधान ग्रंथ, पदक, शाल, पुष्पहार, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पत्रकारिता क्षेत्रातील कर्तृत्ववान माता म्हणून हा पुरस्कार देण्यात आला आहे. निर्मलाबाई कांबळे या पत्रकार राजेश्वर कांबळे यांच्या मातोश्री आहेत. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



लातूर विभागीय शिक्षण मंडळाचा सावळा गोंधळ ! ऐन परीक्षेच्या तोंडावर केंद्र बदलले

कंधार (संतोष कांबळे)

उच्च माध्यमिक मंडळाच्या १२ वीच्या परीक्षेला१० फेब्रुवारी २०२६ पासून सुरुवात होत आहे. परीक्षा ऐन तोंडावर आल्या असताना मंडळाने शहरात दोन परीक्षा केंद्रावर ८९५ मुले- मुली परीक्षा देणार होते. त्यांना प्रवेशपत्र वाटपही करण्यात आली आहे. अशा वेळी लातूर विभागीय मंडळाने ५ फेब्रुवारीला एक आदेश परित करून कंधार शहरात तिसऱ्या परीक्षा केंद्राला मान्यता देऊन या केंद्रावर १६५ विद्यार्थ्यांच्या परीक्षेची व्यवस्था केल्याने ऐन परीक्षेच्या तोंडावर १६५ विद्यार्थ्यांची धावपळ होणार असल्याचे चित्र कंधार शहरात निर्माण झाले असून या प्रकारामुळे शिक्षण विभागाचा सावळा गोंधळ चव्हाट्यावर आला असून शिक्षण विभागाची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. बारावी परीक्षेसाठी शहरात श्री शिवाजी कॉलेज नवरंगपूरा व श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पानभोसी रोड कंधार असे दोन परीक्षा केंद्र आहेत. शहरातील ८९५ विद्यार्थ्यांना दोन केंद्रातून प्रवेशपत्र वाटप करण्यात आले आहेत.यातील १६५ विद्यार्थ्यांना नंदकुमार बिडवई उच्च माध्यमिक विद्यालय या केंद्रावर परीक्षेसाठी जावे लागणार आहे. यात प्रवेशपत्र क्रमांक T0108 44 ते T010968 (विज्ञान), T086837 ते T086876 (वाणिज्य) या नंबरचा समावेश आहे.वरील बैठक क्रमांक मधील विद्यार्थ्यांच्या परीक्षा केंद्रात बदल झाल्याने त्यांनी शहरातील कै.नंदकुमार बिडवई विद्यालयात संपर्क करावा असे आवाहन श्री शिवाजी कॉलेज नवरंगपूराचे प्राचार्य व श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पानभोसी रोड कंधारचे मुख्याध्यापक यांनी केले आहे.परीक्षा ऐन तोंडावर आल्या असताना रातोरात शिक्षण विभागाने तुघलकी कारभाराचे दर्शन घडवत अध्यादेश काढून शहरातील 165 विद्यार्थी व त्यांच्या पालकांना मोठ्या धर्म संकटात टाकलेले आहे. या सावळ्या गोंधळामुळे शिक्षण विभागात कोणत्याही अधिकाऱ्याचे नियंत्रण नसल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाल्याचे दिसून येत आहे. या प्रकारामुळे शहरातील विद्यार्थी व पालकांमध्ये तीव्र संतापाची लाट पसरल्याचे दिसून येत आहे

विद्यार्थांचा स्पर्धांपरिक्षेमधून बौद्धिक विकास..... प्रा.डॉ.उमेश तुळसकर

(ऑलिम्पियाड परीक्षेत गोल्ड मेडल पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार)

समुद्रपुर ता.प्र. (अमोल झाडे) स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबतच आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता विद्यार्थीमध्दे निर्माण होते, ऑलिम्पियाड परीक्षेत गोल्ड मेडल पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रमात बोलतांना प्रा. डॉ. उमेश तुळसकर यांनी असे मत व्यक्त केलेस्थानिक विद्या विकास महाविद्यालयात SOF यांच्या वतीने इंटरनॅशनल ऑलिम्पियाड परीक्षेत गोल्ड मेडल पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा सुवर्ण पदक, प्रमाणपत्र पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. उमेश तुळसकर, अध्यक्ष विद्या विकास संस्था, हिंगणघाट , प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ किशोरचंद रेवतकर, उपप्राचार्य प्रा.मेघशाम ढाकरे,प्रा.जितेंद्र तोमर, हे उपस्थित होते.यावेळी सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशन (एसओएफ) मार्गदर्शन करतात प्राचार्य रेवतकर म्हणाले की ही एक नोंदणीकृत शैक्षणिक संस्था



आहे जी विज्ञान, गणित, इंग्रजी, संगणक, वाणिज्य, सामान्य ज्ञान, सामाजिक अभ्यास आणि हिंदी या विषयांना लोकप्रिय करते. एसओएफ विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक भावना विकसित करण्याचा आणि शालेय अभ्यासक्रमाबाहेरील ज्ञान मिळविण्यास मदत करण्याचा प्रयत्न करते. एसओएफची स्थापना आघाडीच्या शिक्षणतज्ज्ञ, शास्त्रज्ञ आणि माध्यम व्यक्तिमत्त्वांनी केली आहे. विविध उपक्रमांद्वारे शैक्षणिक विषयांची योग्य समज वाढवण्याचा प्रयत्न ऑलिंपियाड करते.प्राचार्य डॉ किशोरचंद रेवतकर यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयात इंटरनॅशनल इंग्लिश ऑलिंपियाड, नॅशनल सायन्स ऑलिंपियाड,इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स इंटरनॅशनल ही परीक्षा घेण्यात आली यामध्ये अळोतीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्यात चौदा विद्यार्थींना गोल्ड मेडल मिळाले.उत्कृष्ठ परिक्षा नियंत्रक म्हणून प्रा जितेंद्र तोमर,प्रा.मनोज बावणे,प्रा.वैशाली सुपारे यांना प्रोत्साहन प्रमाणात देण्यात आले.कार्यक्रमाच्या संचालन प्रा.वैशाली सुपारे तर आभार प्रा मनोज बावणे, यांनी केले.या कार्यक्रमाला प्रा.नरेंद्र मेश्राम,प्रा.सतीश बेले,प्रा.सीमा तडस,प्रा.पुर्वा चांभारे,प्रा.हर्षदा डंभारे,प्रा.दिपाली कोंडमारे,प्रा.नचीकेत ठवरी,धनेश रंगारी,संजिव पवार, योगेश घटे सह विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

आधार फाउंडेशन, हिंगणघाट च्या वतीने शिवजयंती निमित्य विदर्भस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन

तालुका प्रतिनिधी (अमोल झाडे) हिंगणघाट :-

आधार फाउंडेशन, हिंगणघाट वतीने शिवजयंती निमित्याने विदर्भस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेचा मुख्य उद्देश युवकांमध्ये वैचारिक जागृती करणे आणि शिवरायांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हा आहे.ही वादविवाद स्पर्धा विदर्भस्तरावरील असून वय 18 ते 45 वयोगटासाठी असून महाविद्यालयीन विद्यार्थी आणि खुल्या गटातील स्पर्धक सहभागी होता येतील.वादविवाद स्पर्धेच्या विषय- नैतिक



नेतृत्वाचा अभाव आजच्या समाजातील मोठी समस्या आहे/ नाही. स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक रोख रक्कमेची बक्षिसे, प्रोत्साहन बक्षिसे, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल या स्पर्धेचे आयोजन दिनांक 19 फेब्रुवारी 2026 रोज गुरुवार, स्थळ श्री साई मंदिर हॉल, नंदोरी रोड हिंगणघाट जि. वर्धा येथे केले आहे.स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी प्रा.अभय दांडेकर 9960535500, ॲड इंब्राहिम बक्ष 9637657806, डॉ.अनिता मनवर 7350078754, जगदीश वांदिले 8788538544, श्याम निमट 9175326246 यांच्याशी संपर्क करावे असे आवाहन आधार फाउंडेशनचे आयोजकानी यांनी केले आहे.

अपहृत २ वर्षाच्या चिमुकल्या मुलीचा अवघ्या ५ तासात कशोशीने शोध घेवून आरोपीच्या ताब्यातून सुटका करून आरोपीस केली अटक

नागपूर (दिलीप येवले) :- पोलीस ठाणे कळमेश्वर हद्दीतएका खाजगी कंपनीत कामकरणाऱ्या फिर्यादिची २ वर्षाच्या चिमुकल्या मुलीस तीच्या शेजारी राहणारा आरोपी नामे मुकेशकुमार प्यारेसिंग धुर्वे वय २७ वर्षे रा. ह.मु. पो.स्टे. कळमेश्वर हद्द मूळ रा. वॉर्ड कं. ११, दिंडोरी रोड, भर्रा टोला, दिवारीमाल, पोष्ट सामनापूर जि. दिंडोरी, मध्यप्रदेश याने दि. ०६/०२/२०२६ च्या रात्री ०८:०० वा. दरम्यान मुलीच्या आईच्या ताब्यातून तीला खेळण्याकरिता घेवून जाण्याच्या बहाण्याने घेवून गेला आणि खूप वेळ पर्यंत परत न आल्याने सदर मुलीच्या आई वडिलांनी मुलीचा व आरोपीचा सर्वत्र शोध घेतला असता तो कुठेही मिळून न आल्याने नमूद आरोपीने मुलीला पळवून नेल्याची पोलीस ठाणे येथे तकार दिल्याने आरोपीविरूध्द अपहरणाचा गुन्हा नोंद



करण्यात आला. नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांना सदर गुन्ह्याची माहिती मिळताच त्यांनी गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेता आरोपी व अपहृत मुलीचा शोध घेण्यासाठी तात्काळ वेगवेगळे पोलीस पथक नेमूण संपूर्ण नागपूर ग्रामीण जिल्ह्यात व लगतच्या जिल्ह्यांच्या सिमेवर नांकाबंदि व कोंबीग ऑपरेशन राबवून अधिकारी व अंमलदार यांना सकीय केले. तसेच नागपूर जिल्ह्याच्या लगतच्या अमरावती, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, आणि मध्य प्रदेश मधील सिवनी, पांढूर्णा आणि छिंदवाडा जिल्ह्यामध्ये तसेच आरोपीचा मुळ जिल्हा दिंडोरी, मध्य प्रदेश व मूळ गाव येथे स्थानिक पोलीसांच्या मदतीने तात्काळ शोध सुरू केला. तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांना नागपूर रेल्वे स्टेशन आणि गणेशपेठ बस स्थानक येथे तात्काळ रवाना तेथील तसेच परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेज चेक करण्यास रवाना केले. अशा अथक व कसोसीच्या प्रयत्नाअंती अपहृत मुलगी पो. स्टे. कळमेश्वर हद्दीत घटनास्थळापासून ७ कि.मी. अंतरावर एका बस मध्ये लपून असलेली सुखरूप स्थितीत घटना घडल्यापासून अगदी ५ तासांच्या आत मिळून आली व आरोपीचा शोध घेतला असता तो सुध्दा परिसरात मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून गुन्ह्यात अटक करण्यात आली. अपहृत मुलगी ही सुखरूप असून तीच्या सह कोणताही गैरप्रकार झालेला नसून तीची वैद्यकीय तपासणी करण्यात आलेली आहे.

'ॲडव्हांटेज विदर्भ' मधील विद्यापीठ स्टॉल्सचे विद्यार्थ्यांना आकर्षण

-माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या शुभ हस्ते स्टॉल्सचे उद्घाटन

नागपूर (दिलीप येवले) : असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी) यांच्या वतीने आयोजित 'ॲडव्हान्टेज विदर्भ-२०२६ खासदार औद्योगिक महोत्सवातील' राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा स्टॉल विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील मैदानावर आयोजित महोत्सवातील विद्यापीठाच्या स्टॉल्सचे माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या शुभहस्ते फीत कापून उद्घाटन शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले.'ॲडव्हान्टेज विदर्भ-२०२६' खासदार औद्योगिक महोत्सवात देशासह विदेशातील नामवंत कंपन्या सहभागी झाल्या आहेत. तीन दिवस चालणाऱ्या महोत्सवात भेट देणाऱ्या विद्यार्थी तसेच नागरिकांना विद्यापीठाकडून चालविल्या जाणाऱ्या विविध अभ्यासक्रमांची त्याचप्रमाणे नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती व्हावी या उद्देशाने स्टॉल्स लावण्यात आला आहे. विद्यापीठातील पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभाग, रसायनशास्त्र विभाग, प्रवास व पर्यटन विभाग, रुसा सेंटर, इंक्युबेशन सेंटर, औषधी निर्माणशास्त्र विभाग, भूगर्भशास्त्र विभाग, गणित विभाग, प्राणीशास्त्र विभाग, वाणिज्य व व्यवस्थापन विभाग, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, सेंटर फॉर सेरिकल्चर अँड बायोलॉजिकल पेस्ट मॅनेजमेंट रिसर्च आदी विविध विभागातील नाविन्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण केले जात आहे. औद्योगिक महोत्सवात सहभागी होणाऱ्या देशभरातील तसेच विविध देशातील आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत विद्यापीठाच्या वतीने नाविन्यपूर्ण, कौशल्यपूरक, रोजगारक्षम अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत सामंजस्य करार करण्याच्या दृष्टीने चर्चा केली जाणार आहे. या माध्यमातून विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमधील कौशल्य वृद्धी करीत रोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केल्या जाणार आहे. खासदार औद्योगिक महोत्सवात सहभागी होणाऱ्या कंपन्यांना अपेक्षित असलेले कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याच्या दृष्टीने नवनवीन अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत चर्चा केली जाणार आहे. यावेळी कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. मेधा कानेटकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. उमेश पलीकुंडवार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (आयक्यूएसी) संचालक डॉ. नंदकिशोर करडे, इंक्युबेशन फाउंडेशनचे संचालक डॉ. अभय देशमुख, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग संचालक डॉ. समित माहोरे, गणित विभाग प्रमुख डॉ. गणेश केदार, भूगर्भशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कीर्तीकुमार रणदिवे, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय ढोबळे, औषधी निर्माणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र काकडे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नितीन डोंगरदिवे, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वर्षा धुर्वे, वाणिज्य व व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. राहुल खराबे, डॉ. रविन जुगादे, डॉ. रिता वडेतवार, डॉ. विना बेलगमवार, डॉ. सत्येंद्र प्रसाद, डॉ. सत्यप्रिय इंदूरवाडे, रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन, डॉ. सुरेश रैना यांच्यासह विविध विभागातील प्रमुख तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



अवैध दारू बनवणाऱ्या आरोपीतावर खापा पोलिसांची कारवाई

खापा (दिलीप येवले):- दिनांक ०६/०२/२०२६ रोजी पोलीस स्टेशन खापा येथे मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. खापा हद्दीतील मौजा नागलवाडी येथे अवैधरित्या मोहफुलांची हातभट्टीची गावठी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा आरोपी नामे सोमेश्वर रामदास वडस्कर वय ४२ वर्ष रा. नांदागोमुख ता. सावनेर याचे वर पंचांसह छापा टाकून त्याचे जवळून ७ लिटर मोहफुलांची हातभट्टीची गावठी दारू प्रति लिटर किं. १००/- रू. प्रमाणे एकूण किं. ७००/- रू. ची दारू जप्त करून आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

अवैधरित्या देशी, मोहफुलांची दारू बाळगणाऱ्या / विक्री करणाऱ्या आरोपीतांवरनागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई (एकूण ३ आरोपीविरूध्द ३ गुन्हे नोंद. एकूण २६२०/- रू. चा मुद्देमाल जप्त)

केळवद (दिलीप येवले) : – दिनांक ०६/०२/२०२६ रोजी पोलीस स्टेशन केळचद येथे मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. केळवद हद्दीतील मौजा छत्रापुर फाटा येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा आरोपी नामे सोमेश्वर रामदास वडस्कर वय ४२ वर्ष रा. नांदागोमुख ता. सावनेर याचे वर पंचांसह छापा टाकून त्याचे जवळून १८० एम.एल. क्षमतेच्या ४ बॉटल देशी दारू संत्रा नं. १ प्रति बॉटल किं. ८०/- रू. प्रमाणे एकूण किं. ३२०/- रू. ची दारू जप्त करून आरोपीविरूध्द कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला. तसेच २) मौजा छत्रापुर फाटा येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा आरोपी नामे सोमेश्वर रामदास वडस्कर वय ४२ वर्ष रा. नांदागोमुख ता. सावनेर याचे वर पंचांसह छापा टाकून त्याचे जवळून १८० एम.एल. क्षमतेच्या ४ बॉटल देशी दारू संत्रा नं. १ प्रति बॉटल किं. ८०/- रू. प्रमाणे एकूण किं.३२०/- रू. ची दारू जप्त करून आरोपीविरूध्द कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदीअधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

परसोडा ग्रामपंचायत कारभार भ्रष्टाचारने पोखरला

∘ ग्रामसभेत ग्रामस्थांनी विकासात्मक मुद्यावर प्रश्नावली. ∘ दलित वस्ती निधी खर्च प्रकरणी सचिवाकडून टोलवाटोलवी. ∘ पोलिसांच्या मदतीने ग्रामसभेचा शेवट.

∘ ग्रामपंचायत सचिव ग्रामस्थांच्या प्रश्नांनी निरुत्तर.∘ अनुसूचित जाती वर्ग उपसरपंच व सदस्य व्यतिरिक्त मागील ग्रामसभेला जाणीवपूर्वक अनु. जाती वर्गाला डावलले.

आष्टी (शहीद):– आष्टी तालुक्यातील परसोडा येथे ग्रामपंचायत प्रशासनिक कारभार भ्रष्टाचाराने पोखरला असून दिनांक 05/02/26 रोजी झालेल्या ग्रामसभेत परसोडा ग्रामस्थांनी भ्रष्टाचाराचा आलेख मांडला असून ग्रामसचिव यांच्यावर केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी लावून तसेच जाणीवपूर्वक दलित वस्ती निधी खर्च व ग्रामसभेत अनुसूचित जाती वर्गाला डावलनेबाबत कारवाईची मागणी केली. सविस्तर बातमी याप्रमाणे आहे की, दिनांक 26 जानेवारी 2026 रोजी होणारी ग्रामसभा ग्रामसचिव यांनी ग्रामस्थ ला कुठली सूचना व माहिती न दिल्याने तहकूब झाली कारणे परसोडा येथील ग्रामस्थ पंकज चतुर यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे ग्रामसभा घेण्याबाबत व ग्रामसेवक यांचा कामात कसूर बाबत तक्रार सादर केली. त्यानंतर दिनांक 05/02/26 रोजी ग्रामपंचायत परसोडा कडून



ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. ग्रामसभा सुरू होताच ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कडून झालेल्या भ्रष्टाचाराचा आलेख



मांडण्यास सुरुवात केली व ग्रामसेवक यांच्यावर प्रश्नाचा भडीमार सुरू केला. ग्रामस्थांनी उपस्थित केलेले मुद्दे बाबत ग्रामसेवक असमर्थ ठरले तर दलित वस्ती खर्च संबंधी सचिवांना माहिती विचारल्यास टोलवाटोलवी चे उत्तरे देण्यात आली. परसोडा येथे मागील झालेल्या ग्रामसभेत अनुसूचित जातीतील ग्रामस्थांना ग्रामसभेत उपस्थिती नसावी म्हणून जाणीवपूर्वक माहिती होऊ दिले नाही. ग्रामसभेत झालेल्या भ्रष्टाचाराचा आलेख मांडताना परसोडा येथील ग्रामस्थ आक्रमक झाल्याने ग्रामपंचायत प्रशासन कडून पोलिसांना बोलाविण्यात आले. आष्टी पोलीस स्टेशनचे ठाणेदार राजेश जोशी यांनी परिस्थिती पाहता ग्रामस्थांना शांत केले. ठाणेदार राजेश जोशी व प्रशासक हर्षल कालोकर यांनी परसोडा ग्रामस्थांना आश्वासित केले की दोषीवर कारवाई होईल. त्यानुसार प्रशासक हर्षल कालोकर यांनी गटविकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधून ग्रामसेवक यांच्यावर चौकशीचे आदेश काढले व ग्रामस्थांना वाचून दाखवले त्यानंतरच ग्रामसभेचे विसर्जन झाले.

मध्य रात्री भरधावं वेगात जाणाऱ्या मिक्सर मशीन ची पलटी,

बोटोणा गावाजवळ कमळगीर महाराज देवस्थान जवळील घटना, चालक थोडक्यात बचावला

आष्टी शहीद :– प्रतिनिधी कारंजा (घा.)तालुक्यातील नारा येथील सिमेंट मिक्सिन्ग प्लांट मधून सिमेंट गिट्टी मिक्स केलेले मटेरियल भरून मिक्सर मशीन आष्टी तालुक्यातील बोरखेडी गावाजवळ सुरु असलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामाकरिता मटेरियल घेऊन भर धाव वेगात MH12XM9793 क्रमांकचा मिक्सर चालकांच्या निष्काळजी पणा मुळे पलटी झाला. झालेल्या अपघातात चालक गंभीर जखमी झाल्याचे समजते.सविस्तर असे कि,आष्टी तालुक्यातील बोरखेडी



येथील गावाजवळ मध्य रात्री सिमेंट रस्त्याचे काम सुरु आहे. त्या कामाकरिता मिक्स केलेले सिमेंट चे मटेरियल हे मिक्सर मशीन ने कारंजा तालुक्यातील नारा प्लांट मधून आणल्या जाते. प्लांट मधून भर धाव वेगात निघालेला मिक्सर अचानक बोटोणा गावाजवळ येताच मंदिर परिसरात पलटी झाला. मिक्सर मशीनचा चेंदा मेंदा झाला असून चालक मात्र गंभीर जखमी झाल्याचे उत्त आहे. रात्री रस्त्यावर कुणीच नसल्याने मोठी दुर्घटना टाळली असे गावाकरी सांगतात. रात्री काम करणाऱ्या कंपनीतील वाहने समोरून येणाऱ्या वाहणाऱ्या साईट देत नाही त्यामुळे असे अपघात घडतात असे बोलले जाते. मिक्सर मशीन चालवीणारे चालक हे दारूच्या नशेत असतात अशी माहिती प्राप्त झाली. रस्त्यावर पडून असलेल्या मिक्सर मशीनला बाजूला करण्यासाठी काम सुरु होते.

श्री संत गजानन महाराज प्रगटदिन व मुर्ती प्राणप्रतिष्ठा करीता गौळ नगरी सज्ज.!

वारकरी महीला मंडळाकडून परिसराची स्वच्छता

गौळ,(वार्ताहर) येथील श्री संत भदाजी महाराज व महादेवबाबा सच्चिदानंद खटेश्वर महाराज तपोभूमी मठ श्रीक्षेत्र गौळ येथे श्रीसंत गजानन महाराज प्रगटदिन व मुर्ती प्राणप्रतिष्ठा आज रविवार ८ फेब्रुवारी पहाटे पाच वाजता संपन्न होत आहे.त्यानिमित्त येथील वारकरी भजन मंडळाकडून या परिसराची स्वच्छता करण्यात आली.या परिसरात रांगोळी काढण्यात आल्या असून या परिसर सुंगधमय झाला असल्याने परिसरात



दिवाळी सणाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. ७ फेब्रुवारी रोजी राञी श्रीसंत गजानन महाराज यांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली.आज ८ फेब्रुवारी रोजी दुपारी संत सेवक रविंद्र महाराज विलायतकर विणेकरी दिव्य तेजतपोनिधी संत लोटांगण महाराज वारी परंपरा यांचे काल्याचे किर्तन होणार असून गावातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.त्यानंतर एकनिष्ठ गजानन भक्त, वर्धा व गौळ यांच्या तर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून रात्री ७ ते १० सुरसंगम संगित अभंगवाणी वर्धा यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता सर्व वारकरी भजनी मंडळ, गौळ नवयुवक तरुण–तरुणी सहकार्य करीत आहेत.

छत्रपती संभाजी महाराज क्रीडा मंडळ वर्धा मनेरी येथे एक दिवशी कबड्डी सामने संपन्न

तळेगाव प्रतिनिधी छत्रपती संभाजी महाराज क्रीडा मंडळ द्वारा आयोजित भव्य एक दिवसीय कबड्डी स्पर्धा मंगळवार दिनांक 3 फेब्रुवारी 2026 रोजी उद्घाटन सोहळा संपन्न झाला, कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून लाभलेले प्रमुख पाहुणे माननीय श्री आमदार सुमित दादा वानखडे यांची उपस्थिती होती , कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून विश्वास शिरसाट सर उपविभागीय अधिकारी आर्वी तहसीलदार हरीश काळे सर संगीताताई नागोसे सरपंच वर्धमनेरी प्रशांत भाऊ वानखडे कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती आर्वी, राजभाऊ ठाकरे अध्यक्ष आर्वी तालुका भाजपा , राजकुमार मनोरे सर सरपंच पिंपळा पुनर्वसन आशिष भाऊ टिकले, युवा मोर्चा अध्यक्ष आर्वी तालुका, गजानन कटकतलवारे सर ग्रामसेवक वर्धमनेरी मोतीराम भाऊ परतेती सामाजिक कार्यकर्ता ,योगेश भाऊ चवरे माजी सरपंच वर्धमनेरी रमेश भाऊ अमझरे सामाजिक कार्यकर्ता, संजयराव होले पोलीस पाटील वर्धमनेरी,राजूभाऊ खंडारे मीडिया रिपोर्टर यांची उपस्थिती होती बक्षीस वितरण अशोकराव होले सामाजिक कार्यकर्ता , सागर दादा मेहरे सामाजिक कार्यकर्ता, सौरभ भाऊ कोटजावरे, मारुती भाऊ ट्रॉफी व बक्षीस ग्रामस्थ यांच्या तर्फे देण्यात आले द्वितीय पुरस्काराचे मानकरी शिवशाही क्रीडा मंडळ हातुर्णा ही टीम ठरली यांना ट्रॉफी व बक्षीस राहुल दादा मुळे मित्रपरिवार व दिनेश आली बेस्ट अराउंडर ची ट्रॉफी एस के इव्हेंट अँड डेकोरेशन कृष्णा शिंपीकर यांच्या हस्ते देण्यात आले बेस्ट रेडर व बेस्ट डिफेंडर ची ट्रॉफी प्रज्वल राऊत यांच्या हस्ते देण्यात आले व सत्कार माननीय आ. सुमित दादा वानखडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तसेच नियोजन करते राहुल दादा मुळे यांचा सत्कार माननीय श्री आमदार सुमित दादा वानखडे यांच्या हस्ते करण्यात आला व सर्व खेळाडूंना अन्नदाता लाभलेले आशिष दादा मोहेकर यांचे स्वागत छत्रपती संभाजी महाराज क्रीडा मंडळ वर्धमनेरी यांच्या वतीने करण्यात आले कार्यक्रमाचे संचालन सागर दादा मेहरे यांनी केले व आभार प्रदर्शन राहुल दादा मुळे यांनी केले छत्रपती संभाजी महाराज क्रीडा मंडळ वर्धा मनेरीअध्यक्ष यश भाऊ कडू उपाध्यक्ष अभिजीत भाऊ काकडे सचिव सुरज ठाकरे क्रीडा प्रमुख आकाश दादा चवरे शुभम दूधकवरे, सुमित नादणे, रोशन नांदने, अभय डेहनकर, कुणाल नरपाचे , आदित्य नादाने, मोहित चौधरी मयूर काळसरेपे , विकी दारवेकर , निलेश लाडवीकर उपस्थित होते तसेच गावातील सर्व लोकांनी उत्कृष्ट असा प्रतिसाद दिला



राऊत माजी सदस्य ग्रामपंचायत वर्धामनेरी, राहुल दादा मुळे आयुष्यमान भारत सेल संयोजक आर्वी तालुका भाजपा आशिष दादा मोहेकर साईराम कॅटर्स वर्धमनेरी ओनर , योगेश दादा भोंडवे सामाजिक कार्यकर्ता यांची उपस्थिती होती प्रथम पुरस्काराचे मानकरी JMD क्रीडा मंडळ शेदोळा खुर्द ही ठरली यांना दादा डेहनकर यांच्यातर्फे देण्यात आले तृतीय पुरस्काराचे मानकरी शिवशक्ती अकॅडमी नांदगाव पेठ ही ठरली सुरज ठाकरे, आकाश चवरे नवनीत घोडे यांच्या तर्फे देण्यात आली चतुर्थ पुरस्काराचे मानकरी ओम साई क्रीडा मंडळ राजनी ही ठरली छत्रपती संभाजी महाराज क्रीडा मंडळ वर्धमनेरी यांच्या हस्ते देण्यात रविभाऊ दारवेकर पाणीपुरवठा कर्मचारी ग्रामपंचायत वर्धमनेरी , व रामेश्वर दादा तायवडे शिपाई ग्रामपंचायत वर्धमनेरी यांचे शाल व श्रीफळ देऊन माननीय आमदार श्री सुमित दादा वानखडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला , व मोहित मारुती भाऊ चौधरी उत्कृष्ट जिल्हास्तरीय कबड्डी खेळाडू यांचा सुद्धा

न्यु बाल श्री गुरुदेव सेवा मंडळ,बेलघाट यांच्या वतीने पार पाडली भव्य विदर्भस्तरीय खंजेरी भजन गायन स्पर्धा

तालुका प्रतिनिधी (अमोल झाडे) समुद्रपूर :– तालुक्यातील बेलघाट गावात वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या पुण्यतिथी निमित्त भव्य खंजेरी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते पुरुष,महिला व बालगट अशा तीन गटा मध्ये सदर स्पर्धा घेण्यात आली.स्पर्धेचे उद्घघाटन उपस्थित पाहूणे मंडळींच्या हस्ते करण्यात आले नंतर स्पर्धेतून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व.श्री.अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री गजाननराव राऊत (माजी शिक्षक) यांनी केले समस्त मान्यवरांनी आपले विचार मनोगतातून मांडले नंतर सप्तखंजेरी वादक तुषार सुर्यवंशी (नागपूर) यांचा विनोदी प्रबोधनात्मक कीर्तनाचा कार्यक्रम झाला.तर परिक्षक म्हणून श्री शेन्डे गुरुजी व त्यांचे सहकारी मित्र श्री सागरजी भोंगळे यांनी काम



पाहिले.पुरुष गटामध्ये प्रथम पुरस्कार आदर्श गुरुदेव सेवा मंडळ,निमगव्हान यांनी पटकावला महिला गटा मध्ये प्रथम पुरस्कार संतकृपा महिला भजन मंडळ, इंदिरा नगर (चंद्रपूर) यांनी तर बाल गटामध्ये प्रथम पुरस्कार श्री गुरुदेव बाल–बालिका भजन मंडळ,राहित जि.अकोला यांनी पटकावला विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस देऊन गौरविण्यात आले कार्यक्रमाचे संचालन गजानन मोहदरे व गजूभाऊ भुडे यांनी केले.तर आभार प्रदर्शन गजानन मोहदरे यांनी केले.कार्यक्रमाचे आयोजक सर्वश्री गजाननजी राऊत ,कृष्णरावजी मोहदरे, गजाननराव बोरेकर, गोविंदरावजी पुसदेकर,शिवराम जी दुर्गे, गजाननजी मोहदरे, सुभाषजी चौधरी,कुंडलिकदादा चौधरी असूनहि स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कार्तिक मोहदरे, रुपेश देवतळे, श्याम उईके, हेमराज कुकडे,सुरज चौधरी, नितीन धगडे,व समस्त गावकरी मंडळी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

आगामी काळात महाराष्ट्राचा भर धोरण आधारित विकासावर - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

येत्या २-३ महिन्यांत भविष्योन्मुख धोरणे आणणार, ॲडव्हांटेज विदर्भ परिषद-२०२६

नागपूर, (दिलीप येवले) – येत्या काळात महाराष्ट्राचा भर धोरण आधारित विकासावर राहणार आहे. यासाठी आम्ही अनेक धोरणे आखली असली, तरी काही धोरणे जुनी झाली असल्याने भविष्यातील गरजा, बदल आणि आव्हाने लक्षात घेऊन येत्या दोन-तीन महिन्यात विविध क्षेत्रांतील भविष्योन्मुख (फ्युचर रेडी पॉलिसी) धोरणे आणली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिली.असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटद्वारे आयोजित ॲडव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी इंटरनॅशनल बिझनेस कॉनक्लेव्हचे उद्घाटन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. व्यासपीठावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमचे जागतिक अध्यक्ष जितेंद्र जोशी, असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांच्यासह तब्बल २२ देशांचे राजदूत, उच्चायुक्त व बिझनेस प्रतिनिधींची प्रमुख उपस्थिती होती. विशेष म्हणजे याच परिषदेत गुंतवणुकीचे तीन सामंजस्य करारही पार पाडण्यात आले. याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे सध्या वेगाने विकसित होणारे राज्य आहे. त्यातल्या त्यात विदर्भाचा प्रदेश झपाट्याने विकसित होत आहे. महाराष्ट्रात सामंजस्य करार केवळ कागदावर होत नसून ते प्रत्यक्षात साकारले जात आहेत. लॉजिस्टिक्स, एआय, सोलर क्षेत्रामध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. सर्वाधिक विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे. राज्य सरकारने गेल्या काही महिन्यांमध्ये जीसीसी पॉलिसी, जेम्स अँड ज्वेलरी पॉलिसी, बांबू पॉलिसी जाहीर केली आहे. नवे औद्योगिक धोरण आले आहे. यात भर घालून सात नवीन धोरणांची घोषणा येत्या दोन-तीन महिन्यांत होणार आहे. यामध्ये टेक्सटाइल्स अँड ॲपरल, लेदर अँड फूटवेअर, इलेक्ट्रॉनिक्स अँड फॅब, एरोस्पेस अँड डीफेन्स, एमएसएमई, फार्मास्युटिकल बायोटेक अँड मेडिकल डीव्हायसेस, सर्क्युलर इकॉनॉमी, बायो प्लास्टिक या क्षेत्रांतील धोरणांचा समावेश असेल. या सातही धोरणांच्या निर्मितीचे काम सुरू असून येत्या तीन महिन्यांत ते जाहीर करण्यात येतील. यामुळे धोरणप्रेरित गुंतवणूक, उद्योगवाढ आणि आर्थिक विकास हेच महाराष्ट्राचं प्रमुख सूत्र ठरेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. सोलर मॉड्यूलच्या क्षेत्रात नागपूर क्षेत्रात येणारी गुंतवणूक ही देशातील सर्वात मोठी सोलर मॉड्यूल प्रोड्यूसिंग इकोसिस्टीम असून



अद्यापही गुंतवणुकीचा ओघ मोठ्या प्रमाणात सुरुच आहे. कृषी प्रक्रियेसह अनेक निर्मितीक्षम क्षेत्रात नागपूर आणि विदर्भाची मोठ्या प्रमाणात आगेकूच सुरु आहे, अनेक क्षेत्रात गुंतवणुकीच्या नव्या संधी येत आहेत. अगदी गडचिरोलीसारख्या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित होत असून भारताचे स्टील हब म्हणून ते पुढे येत आहे. पुढील दहा वर्षांत गडचिरोलीत पोलादनिर्मितीची सर्वाधिक मोठी क्षमता उभी राहणार आहे. एवढेच नाही, तर गडचिरोलीला पर्यावरणपूरक 'ग्रीन स्टील' हब म्हणून विकसित करण्याच्या दिशेनेही आम्ही ठोस पावले उचलत असल्याचे त्यांनी सांगितले.अदानी समूहाकडून काल कोल गॅसीफिकेशनच्या क्षेत्रात मोठी गुंतवणुक झाली आहे. देशातील अशा स्वरुपाच्या पहिल्याच गुंतवणुकीमुळे विदर्भातील कोल इकोसिस्टीमचे चित्र संपूर्णपणे बदलणार आहे. ईलेक्ट्रीक व्हेईकल्सच्या क्षेत्रात पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूरमध्ये सर्वात मोठी गुंतवणूक येत आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांनी प्रास्ताविकात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नेतृत्वात विदर्भाचा झपाट्याने विकास होत असल्याचे सांगितले. ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमने १५० देशांसोबत करार केला असून त्याचा लाभ विदर्भातील एमएसएमईंना स्वत:चा व्यवसाय वाढविण्यासाठी होणार असल्याची माहिती ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमचे जागतिक अध्यक्ष जितेंद्र जोशी यांनी दिली.

चौकट..

दुसऱ्या दिवशी १०,८३१ कोटींचे सामंजस्य करार

ॲडव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी तीन महत्त्वाचे सामंजस्य करार झालेत. यामध्ये पहिला करार महामेट्रो आणि केअर हॉस्पिटलमध्ये झाला. यात कस्तुरचंद पार्कजवळ महामेट्रोच्या जागेवर पीपीपी मॉडेलवर आधारित सुमारे साडेतीनशेवर खाटांच्या बहुविशेषोपचार हॉस्पिटलचा समावेश असून त्यासाठी सुमारे सहाशे कोटींची गुंतवणूक होत आहे. या प्रकल्पातून सुमारे पंधराशे ते अठराशे रोजगारांची निर्मिती अपेक्षित आहे. दुसरा करार गॅलक्सी सोलर कंपनीसोबत झाला. कंपनीद्वारे १० हजार कोटींची गुंतवणूक करत सोलर सेल, बॅटरी स्टोअरेज सिस्टीमची निर्मिती होईल. या प्रकल्पाद्वारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असा सुमारे चार हजार रोजगारांची निर्मिती अपेक्षित आहे. तिसरा करार टेलिकॉम टॉवरची निर्मिती करणाऱ्या जीआर इन्फ्रास्ट्रक्चरसोबत झाला आहे. कंपनीने २०० कोटींची गुंतवणूक करण्याची घोषणा केली असून याद्वारे सुमारे पाचशे रोजगारांची निर्मिती अपेक्षित आहे. मुख्यमंत्र्याचे आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी या करारांची माहिती दिली.

मनपा विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा जागर 'कारनामा २०२६'

चिटणवीस सेंटरमध्ये घडला प्रतिभेचा आविष्कार!

आकांक्षा फाउंडेशन चा स्तुत्य उपक्रम : विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला मिळालं हक्काचं व्यासपीठ

नागपूर (दिलीप येवले) : नागपूर महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना आणि सृजनशीलतेला व्यासपीठ मिळवून देण्यासाठी, आकांक्षा फाउंडेशनतर्फे सिव्हिल लाईन्स येथील चिटणवीस सेंटर येथे आज (ता.७) 'कारनामा २०२६' या विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचा आविष्कार घडविला.यावेळी मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी. यांनी 'कारनामा २०२६' ला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी स्वतः काही प्रयोगांची प्रात्यक्षिके करून पाहिली आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्याचे कौतुक केले. यावेळी आकांक्षा फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सौरभ तनेजा, संचालक सोमसूर्व चॅटर्जी, 'परसिस्टंट'च्या श्रीमती सुपर्णा देशपांडे, कुमारी अंजू रौतिया, श्रीमती कॅरालाईन नागर, थरमॅक्सच्या श्रीमती सुजाता देशपांडे आणि श्रीमती सुखदा गायकवाड, रेनोव्हेटिओ फाउंडेशनचे श्री. नकुल अग्रवाल, श्रीमती श्रद्धा अग्रवाल, शिक्षक, समुपदेशक आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.नागपूर महानगरपालिका आणि आकांक्षा फाउंडेशनच्या माध्यमातून शहरात सात इंग्रजी माध्यमाच्या शाळा चालवल्या जातात. चिटणवीस सेंटर येथे 'कारनामा २०२६' या स्पर्धेत ध्येय गाठा, प्रगती करा आणि शिखरावर पोहोचा' या ब्रीदवाक्याला अनुसरून पहिल्यांदाच अशा स्वरूपाचे अनोखे प्रदर्शन भरवण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांच्या तांत्रिक आणि गणितीय कौशल्यांची चाचणी घेण्यासाठी 'टिंगर लॅब मिमोसा' आणि 'रेस-द-मॅथ' या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. वयोगटानुसार अर्जुन (लहान गट), नीम (कनिष्ठ गट) आणि अशोका (वरिष्ठ गट) अशा गटांमध्ये या स्पर्धा पार पडल्या. भाषिक कौशल्यासाठी 'वर्ड-ए-थॉन' आणि 'एक्स्टेंपोर' (उत्स्फूर्त भाषण), तर बुद्धिमत्तेच्या कसौटीसाठी 'ब्रेन फ्रीझ' या स्पर्धांनी सर्वांचे लक्ष वेधले. 'आर्ट-प्ले'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कलाकृतींचे आणि चित्रांचे भव्य प्रदर्शनही यावेळी भरवण्यात आले होते. या उपक्रमात मनपा शाळांसह एमएसबी वर्धमाननगर, मॉडर्न स्कूल, जैन इंटरनॅशनल, एसआय कॉन्व्हेंट, सेंट जोसेफ आणि टॉप टोट्स या शाळांनीही सहभाग घेतला. नागरिकांनी या प्रदर्शनाला मोठी गर्दी केली.

एनएसओ (NSO) द्वारे राष्ट्रीय घरगुती उत्पन्न सर्वेक्षण (NHIS) वर एक दिवसीय आंचलिक प्रशिक्षणाचे आयोजन

आगामी राष्ट्रीय घरगुती उत्पन्न सर्वेक्षणाच्या प्रभावी व सुरळीत अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, आंचलिक कार्यालय, नागपूर यांच्या वतीने एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात श्री. श्रीनिवास उप्पला, उपमहानिदेशक, प. अं., आंचलिक कार्यालय, नागपूर यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. आपल्या भाषणात त्यांनी सर्व मान्यवर अतिथी, वक्ते व सहभागी यांचे मनःपूर्वक स्वागत केले. त्यांनी प्रशिक्षणाची गरज व क्षेत्रीय अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण भूमिका यावर प्रकाश टाकला. राष्ट्रीय घरगुती उत्पन्न सर्वेक्षण हे देशाच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे व संवेदनशील सर्वेक्षण असून, त्याचे यश क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या समज, कार्यक्षमता व बांधिलकीवर अवलंबून असल्याचे त्यांनी नमूद केले.यानंतर प्रमुख पाहुणे श्री. अमिताभ शाहा, उपमहानिदेशक, HSD, कोलकाता यांनी उपस्थितांना संबोधित केले. उत्पन्नासारख्या संवेदनशील विषयांवरील सर्वेक्षणांमध्ये नॉन-सॅम्पलिंग त्रुटी हे मोठे आव्हान असल्याचे त्यांनी सांगितले. अशा परिस्थितीतसर्वेक्षण दरम्यान प्रतिसादकर्त्यांना गोपनीयतेची हमी देणे, योग्य मार्गदर्शन करणे व विश्वास निर्माण करणे ही क्षेत्रीय अधिकाऱ्यांची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सर्वेक्षण सुरू होण्यापूर्वी दिले जाणारे प्रशिक्षण ही अशा आव्हानांवर मात करण्याची प्रभावी पद्धत असल्याचेही त्यांनी नमूद केले.सुश्री सुनीता भास्कर, अपर महानिदेशक,NSO(FOD), दिल्ली यांनी आभासी माध्यमातून सभेला संबोधित केले. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की राष्ट्रीय घरगुती उत्पन्न सर्वेक्षणाचे निष्कर्ष शासन व धोरणनिर्माते उत्सुकतेने प्रतीक्षा करीत आहेत, त्यामुळे हे सर्वेक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रशिक्षणादरम्यान मिळालेल्या ज्ञानाचा, प्रात्यक्षिकांचा व गट उपक्रमांचा क्षेत्रीय कामकाजात प्रभावी वापर करण्याचे आवाहन त्यांनी सहभागींकडे केले. तसेच जनजागृती, प्रचार-प्रसार व स्थानिक प्रशासनाशी समन्वय राखण्यावर त्यांनी भर दिला.प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये परस्परसंवादी सत्रे, व्यावहारिक उदाहरणे व गट उपक्रमांचा समावेश करण्यात आला, ज्यामुळे सहभागींची सर्वेक्षणाच्या संकल्पनांबाबत अधिक चांगली समज विकसित झाली.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. एल. एम. जडेजा, निदेशक, प. अं.,आंचलिक कार्यालय,नागपूर यांनी केले. त्यांनी सर्व वक्ते, सहभागी व आयोजनाशी संबंधित अधिकाऱ्यांचे आभार मानले आणि हे प्रशिक्षण राष्ट्रीय घरगुती उत्पन्न सर्वेक्षणाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी मोलाची भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त केला.या कार्यक्रमास श्री. रंगा श्रीनिवासुलु, निदेशक, क्षेत्रिय कार्यालय, नागपूर यांचीही मान्यवर उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचेप्रभावी

सूत्रसंचालन श्री. प्रियांक गौड, कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी यांनी केले. यावेळी आंचलिक कार्यालयातील तथाप. अं.क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

ग्रामविकासात शिक्षण,आरोग्य, रस्ते,पाणीपुरवठा व दिवाबत्ती या पंचसूत्रीवर भर आवश्यक

- पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर, (दिलीप येवले):- ग्राम विकासात शिक्षण,आरोग्य, रस्ते, पाणीपुरवठा व दिवाबत्ती ही पंचसूत्री अत्यंत महत्त्वाची आहे. गावपातळीवरील ग्रामविस्तार अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात या पंचसूत्रीवर लोकभावना त त्यांच्या गरजा लक्षात घेवून विकासाचा आराखडा करून त्यानुसार मागणी वजा प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. उमरेड येथे आयोजित पंचायत समिती आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी खासदार श्याम कुमार बर्वे, आमदार संजय मेश्राम, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, माजी आमदार सुधीर पारवे, राजू पारवे, नगर



पंचायतीच्या नगराध्यक्ष श्रीमती कारू यावेळी उपस्थित होते.शासकीय जमिनीवर जमिनीवर अनेक वर्षांपासून असलेल्या जागांना शासनाच्या नियमांप्रमाने नियमानुकूल करून पात्र अतिक्रमण धारकांना त्यांच्या हस्ते पट्टे वाटप करण्यात आले. तसेच नागरिकांकडून तक्रारी व निवेदन स्वीकारण्यात आली. या निवेदनावर बैठक घेऊन यातील नियामकुल प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. या बैठकीत सरपंचांनी आपापल्या ग्रामपंचायत क्षेत्रात राहिलेल्या विकास कामांबाबत माहिती दिली. उमरेड, भिवापूर, कुही या तिन्ही तालुक्यातील सर्व कामांसाठी डीपीसी मधून निधी उपलब्ध करून देण्याचे त्यांनी सांगितले. घरकुल योजनेसाठी ग्रामपंचायतींना वाळू उपलब्ध करून देण्यात येईल. सोबतच घरकुलधारकांना पाच ब्रास रेती उपलब्ध करून देण्यात येईल असे त्यांनी स्पष्ट केले. सर्व घरकुलधारकांची एकत्रित मागणी ग्रामपंचायतीने सादर केल्यास याचे तत्काळ नियोजन करून वाळू उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मध्ये पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षण विभागाने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावेत. यामुळे मुलांचा कल खाजगी शाळांकडे न राहता जिल्हा परिषद शाळांकडे राहील असे ते म्हणाले. पाणीपुरवठा विभागाने आपले योजनेबाबत परिपूर्ण प्रस्ताव तयार करावेत असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी सर्व विभागाचे तसेच सर्व ग्राम पंचायतीचे सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री संत गजानन महाराज प्रगटदिनोत्सव

नागपूर (दिलीप येवले) :- श्री रामनवमी उत्सव नागपूर-शेगांव दिंडी यात्रा शेगांवचे प्रतिरूप श्री संत गजानन महाराज मंदिर, निर्मल नगरी, नागपूर येथे श्री संत गजानन महाराज प्रगटदिनोत्सव दि. ०५/०२/२०२६ ते ०८/०२/२०२६ या कालावधीत साजरा करण्यात येत आहे.



शनिवार दि. ०७/०२/२०२६ ला दुपारी ४.०० वाजता पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले होते. तरी सर्व भाविकांनी मोठ्यात मोठ्या संख्येने पालखी सोहळ्यात सहभागी व्हावे असे आव्हान आयोजकांनी केलेले आहे.